# प्रकरण चौथे

## आदर्श गाव - राळेगणसिध्दी

४.१ प्रस्तावना

४.२ सैन्यातून परत

४.३ यादवबाबा मंदिराच्या जीर्णोध्दारातून राळेगणसिध्दीच्या विकासकार्याला सुरुवात

४.४ राळेगणसिध्दी : आर्थिक व सामाजिक परिवर्तन

४.५ गावकऱ्यांचे रहाणीमान उंचावले

४.६ आदर्श ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित

४.७ बचतगटाचे कार्य

४.८ सामाजिक परिवर्तन

४.९ दलितांच्या शेतीवरील कर्जफेड

४.१० बैलपोळ्याचा मान दलिताला

४.११ सामूहिक विकासात योगदान

४.१२ दान माणसाला नादान बनविते

४.१३ लक्षावधी रुपयांचे श्रमदान

४.१४  दुग्ध व्यवसाय व महिलोध्दार

४.१५  महिला उध्दाराचे काम

४.१६  महिलांची ग्रामपंचायत

४.१७  बचतगटांतून आर्थिक उन्नती

४.१८  राळेगणसिध्दीतील महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या

४.१९  शैक्षणिक विकास

४.२०  नापासांची शाळा

४.२१  शैक्षणिक विकासाची पंचसूत्री

४.२२  उच्च माध्यमिक विद्यालय

४.२३  ग्रामस्वच्छता, ग्राम आरोग्य

४.२४  परिवार नियोजन

४.२५  धान्य बँक

४.२६  सामूहिक विवाह

४.२७  अंधश्रध्दा निर्मूलन

४.२८  ग्रामपरिवर्तन दिन

४.२९  राळेगणसिध्दी : कालचे आणि आजचे

४.३०  सारांश

## ४.१ प्रस्तावना :

संतांची भूमी म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७४१३ चौरस किलोमीटर असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.६६% इतके आहे. या जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर नाशिक, ईशान्येस औरंगाबाद, पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे असून, दक्षिण सीमेवर सोलापूर, पश्चिम सीमेवर ठाणे व पुणे जिल्हे लागून आहेत. महाराष्ट्रात फक्त दोन जिल्हे असे आहेत, की त्यांना सात जिल्ह्यांच्या सीमा लागून आहेत. अहमदनगर त्यांपैकी एक असून, मराठवाड्यात परभणी हा दुसरा असा जिल्हा आहे.

पश्चिमेकडील डोंगराळ भाग व पूर्वेकडील सखल भाग हे जिल्ह्याचे स्वाभाविक विभाग आहेत. पश्चिम भागातील हवामान थंड व कोरडे आहे, तर पूर्व भागातील हवामान उष्ण व कोरडे आहे. जिल्ह्यातील १५८१ खेडी १४ तालूक्यांत विखुरलेली आहेत. १४ पंचायत समित्या, १३११ ग्रामपंचायती, १ महानगरपालिका, ८ नगरपालिका, १ नगर पंचायत, १ कटक मंडळ जिल्ह्यात आहेत. जिल्ह्यात १४ तालूके असून त्यांपैकी एक पारनेर तालूका होय.[१]

पारनेर तालुक्याचे क्षेत्रफळ १९,३,०२८ हेक्टर असून, कृषी क्षेत्र १४,७,७६३ हेक्टर आहे. तर वनक्षेत्र १८,७९२ हेक्टर आहे. तालुक्यात १३१ खेडी असून २,४६,५५५ लोकसंख्या आहे.[२]

कृषी, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात प्रगती केलेले पारनेर तालुक्यातील राळेगणसिध्दी हे गाव आदर्श खेडे म्हणून प्रसिध्द असून भारतातील विविध राज्य प्रशासकीय अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते

तेथे अभ्यासासाठी भेटी देत असतात. राळेगणसिध्दी या अत्यंत मागास गावाचा कायापालट भारतीय लष्करातील सेवानिवृत्त सेवक पद्मभूषण श्री. अण्णासाहेब हजारे यांनी केला. कृषी सिंचन, सामाजिक वनीकरण, गोबर गॅस, कुटुंब नियोजन, शिक्षण, समाजकल्याण इ. क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती घडवून आणली व गाव व्यसनमुकत केले. राळेगणसिध्दी हे राज्यातीलच नव्हे तर भारतातील एक आदर्श गाव असून, विविध राज्यांतील शासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते अभ्यासासाठी येथे वारंवार भेट देतात. राळेगणच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने ३०० गावे निवडली असून, १५ गावे अहमदनगर जिल्ह्यातून निवडली आहेत.[३]

अशा प्रकारे आपणास या प्रकरणात राळेगणसिध्दी या गावचा अण्णा हजारे यांनी कसा कायापालट केला. मागास क्षेत्रातून आदर्श खेडे करण्यासाठी कोणत्या संकटांना सामोरे जावे लागले, कोणत्या योजना राबवाव्या लागल्या याचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

## ४.२ सैन्यातून परत :

सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर अण्णा हजारे राळेगणसिध्दी या आपल्या मूळ गावी परत आले. तेथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीवर तुळशीची माळ ठेवून गळ्यात घातली आणि त्यांनी ज्ञानेश्वर माऊलींना मनोभावे सांगितले, “ही माझ्या गळ्यात तुळशीची माळ नव्हे, तर माझ्या देहावरचे तुळशीपत्र आहे. आजपासून हा देह माझा नव्हे, तर तो समाजाचा आहे.” नंतर राळेगणसिध्दी (ता. पारनेर) येथे आले. गावची अवस्था दयनीय होती. ‘हातभट्टीचे गाव’ अशीच गावाची ख्याती होती. याही परिस्थितीत गावाच्या परिवर्तनाचा ध्यास अण्णा हजारे यांनी घेतला.

'ज्ञानेश्वरी'तील चौदाव्या अध्यायातील २३३ वी ओवी

नगरेंचि रचावीं | जलाशयें निर्मावीं ||

महावनें लावावीं | नानाविधें ||

या ओवीचे अनुकरण करण्यास अण्णा हजारे यांनी सुरुवात केली. त्यामुळे राळेगणसिध्दीचे चित्रच पालटले. गावात पडलेल्या पावसाचा थेंब न् थेंब अडवून भू-गर्भात जिरविण्याचा प्रयत्न केला. यातून गावाला एक नवी दिशा मिळाली. हे काम करीत असताना, त्यांना खूप त्रास सहन करावा लागला.[४]

## ४.३ यादवबाबा मंदिराच्या जीर्णोध्दारातून राळेगणसिध्दीच्या विकासकार्याला शुभारंभ

१९७५ मध्ये अण्णा हजारे राळेगणसिध्दी या आपल्या मूळ गावी परत आले. स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणेतून जीवन जनसेवेसाठी अर्पण केले होते; परंतु जनसेवेला सुरुवात कशी करावी ते अण्णा हजारे यांना उमजत नव्हते. नक्की काय करावे याची जुळणी मनाशी झाली नव्हती. दुष्काळ तर राळेगणसिध्दीच्या पाचवीला पुजलेला होता. पोटासाठी लोक हातभट्टीच्या व्यवसायाकडे वळले होते. गावात श्री संत यादवबाबाचे समाधी मंदिर आहे ते, मंदिरही उद्ध्वस्त झाले होते. गावात झाडझ ाडोरा नसल्याने मंदिराची लाकडेही लोकांनी हातभट्टीत जाळली होती. माणसाच्या पोटातील भूक माणसाला काय करायला लावते याचे ते एक उदाहरण होते. हे सारे पाहून अण्णा हजारे यांच्या मनाला खूप वाईट वाटले. गाव सुधारायचा विचार मनात सुरु झाला. त्या वेळी आठ महिने ग्रामसेवा करायची

आणि चार महिने पंढरपूरला एकांतवासात घालवावे असा निर्णय अण्णा हजारे यांनी घेतला आणि त्यानुसार त्यांनी ग्रामसेवेला सुरुवात केली.

प्रत्येक गावात मंदिरे असतात. मंदिरात लोक एकत्र येतात. प्रत्येक मंदिरात पाषाणाची देवाची मूर्ती असते. तिची गावकरी पूजा करतात. तसे गावही एक मंदिर आहे. गावातील जनता त्या मंदिरातला पांडुरंग आहे. त्या चैतन्यशील पांडुरंगाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. मंदिरातील देव एकाच जागी असतो; गावरुपी मंदिरातील जनतारुपी जनार्दन एका जागेवर नसतो. पोटासाठी सदैव लटपटी-खटपटी करतो. त्यासाठी एकमेकांचा व्देष करतो. त्याच्यात एकभाव नसतो. तो एकभाव आणि एकता निर्माण करण्यासाठी यादवबाबा मंदिरालाच समाजसेवेचे मंदिर बनविण्याचा विचार अण्णा हजारे यांनी मनात निश्चित केला. मंदिराच्या माध्यमातून आध्यात्मिक व नैतिक मूल्यांची जोपासना करण्याचे प्रयत्न अण्णांनी सूरु केले. सेनादलातून निवृत्त झाल्यावर अण्णा हजारे यांना ग्रॅच्युईटी व प्रॉव्हिडंट फंडाचे वीस हजार रुपये मिळाले होते, त्या पैशातून यादवबाबा मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम त्यांनी हाती घेतले. कूणाकडूनही वर्गणी न मागता सेनादलातील हा निवृत्त जवान स्वखर्चाने मंदिराचा जीर्णोध्दार करतोय याचे गावकऱ्यांना नवल वाटू लागले. हळूहळू लोक अण्णा हजारे यांना मंदिर बांधकामात त्यांना मदत करु लागले. गावातील मंदिर हा प्रत्येक गावकऱ्याच्या श्रध्देचा विषय असतो. लोक इतर कार्यात मदत करण्यास नाखूष असतात; परंतु मंदिरासाठी ते पुढे येतात. श्री संत यादवबाबा मंदिराच्या जीर्णोध्दारात त्याचा अनुभव अण्णा हजारे यांना आला.

अण्णा हजारे यांच्या जवळचे पैसे बांधकामात खर्च झाले. पुढचे सारे काम गावकऱ्यांनी श्रमदानातून पूर्ण केले. दीड वर्षात श्री संत यादवबाबा मंदिराचे दोन लक्ष रुपयांचे काम पूर्ण झाले. सुंदर

व पवित्र असे मंदिर उभे राहिले. याच मंदिरातून चारित्र्यसंपन्न पुरुषांची कीर्तने, प्रवचने आणि व्याख्याने इत्यादी कार्यक्रम करावयास सुरुवात केली. यातूनच गावात आध्यात्मिक आणि वैचारिक परिवर्तन होण्यास सुरुवात झाली. पूर्वी गावात कुणी श्रमदान करत नव्हते. संत यादवबाबा मंदिराच्या जीर्णोध्दारातूनच गावात श्रमदानाला शुभारंभ झाला आणि राळेगणसिध्दीच्या विकासालाही शुभारंभ झाला. मंदिराच्या जीर्णोध्दारामुळे लोक एकत्र येऊ लागले.[५]

## ४.४ आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन :

### आर्थिक परिवर्तन :

नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी |
एक तरी ओवी अनुभवावी ||

या संत नामदेवरायाच्या वचनानुसार ज्ञानेश्वरीतील १४ व्या अध्यायातील २३३ वी ओवी अण्णा हजारे यांनी अनुभवली. राळेगणसिध्दीकरांनी अनुभवली. ती ओवी जीवनात उतरवून पावसाचा कृपाप्रसाद भूमीवर अडवून, भूमातेच्या उदरात जिरवला. ज्ञानेश्वरीतील २३३ व्या ओवीने राळेगणसिध्दीत चमत्कार घडला. जलदेवता राळेगणसिध्दीकरांवर प्रसन्न झाली. नव्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचा भक्कम पाया रचला गेला. जिथं दीडशे एकर जमिनीच्या एका पिकाला पट्यात पाणी मिळत पुरेसे, तिथे १५०० एकर जमिनीची पाण्याची भूक भागायला लागली. खरीप व रब्बी पिकांना पाणी मिळायला लागले. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकण्याच्या वनवासातून महिलांची मुक्तता झाली.

उदंड जाहले पाणी, स्नान संध्या कराया ||

या समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे राळेगणसिध्दीच्या भूमीत जलसंचय झाला. ८०% लोकांना पुरेसे धान्य मिळत नव्हते. त्यांच्या धान्य उत्पादनात आठ पटींनी वाढ झाली. त्यांना बाहेरुन धान्य आणण्याची गरज राहिली नाही. शेतात धान्याबरोबरच शेतकरी भाजीपाला पिकवू लागले. आता दरवर्षी २०० ते २५० ट्रक कांदा नगर, पुणे, मुंबईच्या बाजारात विक्रीसाठी जातो. त्याच्या जवळपास एक कोटी रुपये गावात येतात. दुधाच्या व्यवसायाचे व्यवस्थापन महिला आणि तरुण मुले उत्तमरीत्या करीत आहेत. दूध व्यवसायाची भरभराट राळेगणसिध्दी मध्ये झाली. पूर्वी गावातील उत्पन्न अवघे २०० ते २२५ होते, आता ते दहा पटींनी वाढून ३००० रुपयांवर गेले आहे. पूर्वी लोकांना कामासाठी बाहेरगावी जावे लागायचे, आता शेतीसाठी गावात मजूर मिळत नाही. बाहेरुन मजूर आणावे लागतात अशी परिस्थिती आहे.

## ४.५ गावकऱ्यांचे राहणीमान उंचावले :

प्रत्येक परिवाराच्या उत्पन्नात वाढ झाल्यावर राहनीमानही उंचावले. राळेगणसिध्दी गावातील लोक पूर्वी झोपड्यांत रहायचे. आता आर.सी.सी. सिमेंट कॉंक्रिटची बंगलेवजा घरे राळेगणसिध्दीत उभी आहेत. घराघरात स्वयंपाक करण्यासाठी गॅस आला आहे. दुचाकी आल्या आहेत. टी.व्ही. आले आहेत. फ्रीज आले आहेत. काही जणांकडे चारचाकी वाहने आली आहेत. सुशिक्षित युवक शेतीबरोबर टेंपो वाहतूक व रिक्षा चालवण्याचा व्यवसाय करीता आहेत. राळेगणसिध्दी येथे कुणी रिकामा बसला आहे

अशी परिस्थिती नाही. प्रत्येकाच्या हाताला काम आहे. विविध व्यवसाय गावात सुरु झाले आहेत. भूमिहीनही सुखीसमाधानी जीवन जगत आहेत.

### ४.६ आदर्श ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित

पावसाचे अल्प प्रमाण आणि दर दोन वर्षांनी उद्‌भवणारा दुष्काळ याचा सामना करताना राळेगणसिध्दीतल्या प्रत्येक माणसाला आर्थिक पराभवाला सामोरे जावे लागायचे. त्यात जमिनी अगदी तीन ते सहा क्रमांकापर्यंत निष्कृष्ट दर्जाच्या. त्यात पुरेशा पाण्याचा अभाव, त्यामुळे जमिनी नापीक पडलेल्या असायच्या. घरात लग्नकार्य वा इतर दुसरे कार्य निघाले, की शेतकरी डोक्याला हात लावून बसायचा. शेवटी सावकाराचे पाय धरायचा. काहींनी लग्नकार्यासाठी तर काहींनी उदरनिर्वाहासाठी सावकाराचे कर्ज काढले होते. पारनेर, जातेगाव, घाणेगाव, वडणेर या सावकाराच्या पाशात बहुसंख्याक राळेगणकर अडकले होते. राळेगणसिध्दीतले तीनचार सधन सावकारीचा व्यवसाय करायचे. कर्ज देताना सावकार जमिनी लिहून घ्यायचे. गरिबांची तर खूप छळवणूक व अडवणूक करायचे. त्यांच्या जमिनीचे खरेदी खतही लिहून घ्यायचे. एकूण गहाण जमिनीपैकी अर्ध्या जमिनीतले पिकाचे उत्पादन तीन वर्षांपासून सात वर्षांपर्यंत सावकार खायचा. ३५-४० वर्षापूर्वी कर्जावरील व्याजाचा दरही ३५-४० टक्के एवढा होता. म्हणजे शंभर रुपयाला वर्षाचे ३५ ते ४० रुपये एवढे व्याज द्यावे लागायचे. काही लोकांना सावकार धान्य कर्जाऊ द्यायचा. धान्याच्या किमती ठरवून त्यालाही भरमसाट व्याज लावायचा. ठरलेल्या मुदतीत व्याजासहित कर्जाची रक्कम भरली नाही तर सावकार जमिनी जप्त करायचा. या सर्व प्रकाराने राळेगणसिध्दीतला शेतकरी देशोधडीला लागला.

कर्ज व व्याज वसुलीसाठी अमावास्या व पौर्णिमा या दोन तिथी ठरलेल्या होत्या. काही सावकार अमावास्येला, काही पौर्णिमेला घोड्यावरुन यायचे. सावकार येताना दिसले, की अमावास्या आली, पौर्णिमा आली असे लोक म्हणायचे. सावकारांचीही तशी नावे शेतकऱ्यांनी ठेवली होती. १९८२ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्रने आपली शाखा राळेगणसिध्दीत सुरु केली. शेतकऱ्यांना बँकेकडून कर्जे मिळू लागली. त्यामुळे सावकारीला आळा बसला. बँकेचे घेतलेले कर्ज सर्वांनी प्रामाणिकपणे फेडले. एक दिवस ग्रामसभेत चर्चा झाली. आपणच आपल्या गावाची पतसंस्था काढावी. त्यामुळे आपण घेतलेल्या कर्जाचे व्याज आपल्याच पतसंस्थेला मिळेल. आपल्याच विकासासाठी त्याचा उपयोग होईल, असा निर्णय ग्रामसभेत झाला. त्यानुसार १९९० मध्ये 'आदर्श ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित' या नावाने पतसंस्था स्थापन झाली. पंचावन्न लक्ष रुपयांच्या भागभांडवलावर सुरु झालेल्या या पतसंस्थेव्दारे विविध उद्योगधंद्यांसाठी सुलभ कर्जपुरवठा होऊ लागला. वाहने, शिक्षण, विवाह, घरबांधणी, आजारपण इ. विविध गरजांसाठी लोकांनी कर्ज घेतले. कर्जाची फेड लोक व्यवस्थित करतात. पतसंस्था नफ्यात आहे. पाणलोट विकासातून आर्थिक विकास झाल्यावर याच पतसंस्थेत राळेगणसिध्दीकरांनी ४ कोटी रुपयांच्या ठेवी ठेवल्या आहेत. तेवढ्याच ठेवी बँक ऑफ महाराष्ट्रमध्येही आहेत. एवढे मोठे आर्थिक परिवर्तन पाणलोट क्षेत्र विकासाने घडविले आहे.

## ४.७ बचतगटांचे कार्य :

बचतगटही गावात स्थापन झाले. बचतगट व पतसंस्थेमुळे खासगी सावकारशाही पूर्णपणे नष्ट झ ाली. कर्जावरील व्याजाचा जो लाभ सावकार व नंतर बँकेला व्हायचा तो आता गावातील सभासदांना

होत आहे. त्याचा गावाच्या सामूहिक विकासाला हातभार लागत आहे. बँका आणि संबंधित संस्था या देशातील जनतेच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या नाड्या आहेत; परंतु जागतिकीकरणाच्या नावाखाली या क्षेत्रातला सेवाभाव, राष्ट्रीय दृष्टिकोन जाऊन अधिक नफ्याची प्रवृत्ती वाढत आहे. गरीब माणसांना कर्जपुरवठा करताना योग्य मार्गदर्शन करुन त्याला दारिद्र्यरेषेच्या वर आणायला पाहिजे. घेतलेल्या कर्जाचा योग्य विनियोग करुन त्याच्या उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करायला हवेत. शेतकरी स्वतःच्या पायावर उभा राहील याची काळजी घ्यायला हवी; परंतु तसे होताना दिसत नाही.

एकमेका साहाय्य करु, अवघे धरु सुपंथ या संत तुकारामांच्या अभंगानुसार नागरी बँक, सहकारी बँका व पतसंस्था यांचा कारभार चालला पाहिजे. त्यामुळे सामाजिक व आर्थिक विकासाला मोठा हातभार होईल.[६]

## ४.८ सामाजिक परिवर्तन :

आर्थिक राहणीमान उंचावल्यानंतर अनेक जण चैनबाजीकडे वळतात. नाही ते खायला लागतात. नको ते प्यायला लागतात. जवळ पैसा आला, की उन्मत्तपणा वाढतो. श्रीमंतीचा अहंकार निर्माण होतो; परंतु राळेगणसिध्दीमध्ये तसे घडले नाही. कारण राळेगणसिध्दीकरांच्या मनावर अध्यात्माचा ठसा होता. पाण्याशिवाय नाव चालत नाही तसे पैशाशिवाय जीवन चालत नाही; परंतु नावेत पाणी गेले तर नाव बुडते. त्याचप्रमाणे जवळ अधिक धनसंजय झाला, की त्यात जीवन बुडून जाते. आपण जन्मतानाही बरोबर काही आणत नाहीत, मरतानाही बरोबर काही घेऊन जात नाहीत. सर्वकाही इथेच सोडून जावे लागते. म्हणून संत कबीर म्हणतात -

कवडी कवडी माया जोडी, रुपया लाख करोड |

यमराज की चिठ्ठी आयी, चल लंगोरी छोड ||

याची जाणीव प्रत्येक राळेगणसिध्दीकराला आहे. परिश्रमातून त्याने पाणी कमविले, पण पाण्याचा त्याने वाटेल तसा वापर केला नाही. आपल्या शेतीत घाम गाळून पाण्याचे त्याने योग्य सिंचन केले. त्यातून चार पैसे शेतकऱ्याच्या हाती येऊ लागले. त्याची गरिबी हटली; परंतू मिळालेला पैसा त्याने वाटेल तसा उधळला नाही, तर त्यातला काही भाग गावासाठी वापरला. खालच्या माणसाला वर आणण्यासाठी तन, मन, धन समयदान व श्रमदान दिले. हे आर्थिक परिवर्तनातून राळेगणसिध्दीत घडलेले मोठे परिवर्तन होय.

## ४.९ दलितांच्या शेतीवरील कर्जफेड :

पूर्वी राळेगणसिध्दीमध्ये जातीपातीला महत्त्व होते. अस्पृश्यता पाळली जात होती. दलितांना जनावरांपेक्षाही वाईट वागणूक दिली जात होती. एखादा सवर्ण दलितांना शिवला तर लोक अंघोळ करायचे. त्याच दलितांच्या जमिनीवरील कर्ज राळेगणसिध्दीकरांनी फेडले. हा सामाजिक परिवर्तनाचा उच्च बिंदू आहे. मध्यवर्ती सहकारी बँक, अहमदनगर येथून दलित शेतकऱ्यांनी ६० हजार रुपयांचे सामूहिक कर्ज काढले होते; परंतु वीजबिल थकल्याने वीज बोर्डाने कनेक्शन तोडले. शेतीला पाणीपुरवठा बंद झाला. वीजबिल भरण्याची कुणाची ऐपत नव्हती. शेती ओस पडली. व्याजामुळे कर्जाचा बोजा वाढला. बँकेने नोटिसा काढल्या. जमिनी जप्त होण्याची वेळ आली. सर्व दलित अण्णा हजारे यांच्याकडे आले 'आमच्या जमिनी वाचवा' म्हणाले. ग्रामसभा भरवून सर्व गावकऱ्यांना अण्णा हजारे यांनी

आवाहन केले. दलितांच्या शेतीत राबून कर्ज फेडण्याचा ठराव ग्रामसभेत पास झाला. लोक कामाला लागले. वीजबोर्डाकडून वीजबिलाचे हप्ते गावकऱ्यांनी बांधून घेतले. बँकेकडूनही कर्ज फेडण्यासाठी मुदत बांधून घेतली. दोन वर्षे राबून दलितांची शेती गावकऱ्यांनी फुलविली. १७ दलितांच्या शेतीवरील साठ हजारांचे कर्ज फेडून सर्वांना गावकऱ्यांनी कर्जमुक्त केले. त्यांचे सातबाराचे उतारे कोरे करुन जमिनी पुन्हा त्यांच्या ताब्यात दिल्या.[७]

### ४.१० बैलपोळ्याचा मान दलिताला :

राळेगणसिध्दीत मुक्या जनावरांचा आदर - सन्मान राखणारा बैलपोळा दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो; परंतु वेशीतून कुणाचा बैल प्रथम न्यायचा या मानापानावरुन दरवर्षी वेशीत हाणामाऱ्या व्हायच्या. वेशीतून प्रथम बैल न्यायचा मान ग्रामस्थांनी (ग्रामसभेने) दलितांना बहाल केला. त्याला चौदा वर्षे झाली. आजही दर बैलपोळ्याला दलितांचा बैल मिरवणुकीने प्रथम वेशीतून जातो. त्यामागून बाकीच्यांचे बैल जातात. दलितांना उत्तम घरे बांधून देण्यातही ग्रामस्थांनी श्रमदान केले आहे. सामुदायिक विवाह सोहळ्यात सवर्ण, दलित, चर्मकार व सर्व मागासवर्गीयांतील वधूवरांचे सामूहिक विवाह एकाच मांडवात होतात. सर्वजण एकाच पंगतीला शेजारी - शेजारी बसतात. एवढेच नव्हे तर स्वयंपाक करण्यासाठी व वाढण्यात सवर्णांबरोबर दलित समाजाच्या महिला, पुरुष असतात. आज गावात 'एक गाव - एक परिवार' ही भावना वृध्दीगत झाली आहे. 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' हा पूज्य सानेगुरुजींचा संदेश प्रत्येक राळेगणसिध्दीकरांच्या हृदयात उतरला आहे.[८]

### ४.११ सामूहिक विकासात योगदान :

गावच्या कोणत्याही सामूहिक कामात दान स्वीकारायचे नाही. हा राळेगणसिध्दीकरांचा दंडक आहे. राज्यपाल लतीफ यांच्यासारख्यांचे शाळेसाठी दिलेले योगदान वगळता गावाच्या विकासाच्या वास्तू उभारणीत गावकऱ्यांनी स्वतः तन-मन-धन ओतले. १९७५ मध्ये जवळचे वीस हजार रुपये खर्च करुन बांधलेल्या श्री संत यादवबाबा समाधीचा जो जीर्णोध्दार केला त्याचे पंचवीस लाख रुपये खर्च करुन ग्रामस्थांनी नूतनीकरण केले. अतिशय देखणे असे मंदिर उभारले. मुलांच्या वसतिगृहाची इतारत, भोजनकक्ष व हॉलच्या उभारणीसाठी २८ लक्ष रुपयांची शाळेची इमारत बांधली. इतर अनेक सार्वजनिक वास्तू राळेगणसिध्दीत उभ्या राहत आहेत. पद्मावती देवीच्या मंदिराचा जीर्णोध्दार होत आहे. विशाल वटवृक्षांनी शृंगारलेल्या निसर्गरम्य पदमावती मंदिराच्या परिसराचे उद्यानात रुपांतर करण्याचे काम चालू आहे. या परिसरात पक्ष्यांसाठी निवारे बांधण्याचा व एक उत्तम प्राप्ती संग्रहालय उभारण्याची गावकऱ्यांची योजना आहे. पद्‌मावती उद्यान निसर्ग व पर्यावरणाचे शिक्षण देणारे केंद्र बनणार आहे.

### ४.१२ दान माणसाला नादान बनविते :

बाहेरच्या दानशूरांना गावकऱ्यांनी आवाहन केले असते तर लाखो रुपयांच्या देणग्या मिळाल्या असत्या; परंतु बाह्य देणग्यातून उभ्या राहिलेल्या वास्तूंचे मोल ग्रामस्थांना वाटत नाही. ज्या वास्तूसाठी आपला कष्टाचा पैसा आणि श्रम झाले आहेत अशी वास्तू सर्वांना आपली वास्तू वाटते. 'दान मानसाला

नादान बनविते’ असे आचार्य विनोबा यांनी म्हटले आहे. एकदा दान घेण्याची सवय जडली, की माणूस सत्व गमावून बसतो. आयत्या पिठावर रेघोट्या ओढण्याची सवय त्याला लागते. तो स्वाभिमानशून्य आणि लाचार बनतो; परंतू एखादे गाव आर्थिकदृष्ट्या अतिशय दुर्बल आहे. त्याला प्रारंभी कुणाची तरी मदत घ्यावीच लागेल. मदतीविना त्याला पुढे जाता येणार नाही; मग अशावेळी विकासासाठी बाह्य मदत स्वीकारावी की नाही ? असा प्रश्न निर्माण होतो. गरीब खेड्यांनी बाह्य मदत जरुर स्वीकारावी; परंतु कायम दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून राहता कामा नये याचेही भान ठेवावे. घरात एखादे रांगणारे मूल असेल तर त्याला आपण हात धरुन उभे राहायला शिकवतो, दोन पावले चालायला शिकवतो. त्याच्या पायात बळ आले आणि ते बाळ स्वत:च्या पायावर एकटे चालायला लागले, की आपण पांगूळगाडा फेकून देतो. त्याचप्रमाणे गरीब गावाने बाह्यमदतीवर प्रथम उभे राहावे. विकासाकडे पावले पडायला लागली, की बाह्य मदतींचा पांगूळगाडा फेकून द्यावा. आपल्या ताकदीवर पुढच्या विकासाची वाटचाल करावी; कारण ‘दान मानसाला नादान करते.’

### ४.१३ लक्षावधी रुपयांचे श्रमदान :

राळेगणसिध्दीकरांनी देणग्या स्वीकारल्या असत्या तर देणग्यांचा पाऊस पडला असता. त्यातून राळेगणचा विकास झाला असता, तर गाव पाहायला आलेल्यांनी नाके मुरडली असती. बडे उद्योगपती यांच्या पाठीशी उभे राहिले म्हणून राळेगणचा विकास झाला. अण्णा हजारेंचे व गावकऱ्यांचे त्यात काही कर्तृत्व नाही, असे टोमणे लोकांनी मारले असते. हे सर्व धोके ओळखून ‘जळो जिणे परावलंबिले’ या

संत वचनानुसार राळेगणसिध्दीकरांनी कुणाच्या दानावर अवलंबून राहायचे नाही असा निर्णय घेतला. त्याप्रमाणे स्वावलंबनातून कामे उभारली.

लोकवर्गणी आणि श्रमदान करुन लोकोपयोगी वास्तू, राळेगणसिध्दीकरांनी उभारल्या. अठरा ते वीस लक्ष रुपयांची इमारत राळेगणकरांनी केवळ पाच लक्ष रुपयांत उभारली; परंतु कुणाचीही देणगी स्वीकारली नाही. अशी, कितीतरी कामे राळेगणकरांनी उभी केली, सरकारी योजनेचा लाभ जरुर घ्यावा. सरकारी पैसा हा कुणा धनिकाच्या मालकीचा नसतो तर जनतेच्या करातून जमा झालेला असतो; परंतू सरकारी निधीतून उभ्या राहणाऱ्या कामात ग्रामस्थांच्या श्रमदानाचेही योगदान पाहिजे. सरकारी योजनेतून एक रुपया गावात येत असेल तर त्यात श्रमदानाव्दारे २५ पैसे आम्ही टाकू हा विचार करुन राळेगणसिध्दीत काम झाले. गरज पडेल तेथे बँकेचे आर्थिक साहाय्य घेतले.

राळेगणसिध्दी दुष्काळात होरपळलेले तेच गाव आहे. दुष्काळाचे चटके सोसलेली गावकरी मंडळीही तीच आहेत जमीनही तीच आहे; परंतु परदेशांतून अथवा कुणाकडून देणग्या न घेतल्याने गाव स्वावलंबी झाले. महात्मा गांधींच्या स्वावलंबी खेड्याचा मार्ग स्वीकारल्याने राळेगणसिध्दीचा कायापालट झाला. गांधींच्या स्वावलंबी खेडी निर्मिणाऱ्या विचारांना तिलांजली दिल्याने भारतीय खेड्यांची आज दुर्दशा झाली आहे. देशातील अनेक राज्यांतील लोक राळेगणसिध्दीला येतात. महात्मा गांधींच्या स्वप्नातले स्वच्छ, स्वावलंबी, आदर्श खेडे पाहतात. आपणही असे काही करु शकू असा निर्धार करुन परत जातात. यातच राळेगणसिध्दीचे यश आहे.[९]

**४.१४ दुग्ध व्यवसाय व महिलोध्दार :**

१९७५ मध्ये राळेगणसिध्दीच्या विकासाचे काम अण्णा हजारे यांनी सुरु केले. त्या वेळी राळेगणसिध्दीत केवळ तीन चार दुभती जनावरे शेतकऱ्यांकडे होती. तीन-चार किलोमीटरवरील दूध संकलन डेअरीला ते दूध घालीत. हळूहळू पाणलोट विकासाचे काम झाले. भूगर्भात पाण्याची पातळी वाढली. शेतीत पिकं यायला लागली. चाऱ्याची पिकं शेतकरी घेऊ लागले. डोंगरात गवत यायला लागले. चराइबंदीमुळे गवत चांगले वाढायला लागले. लोक गायी खरेदी करु लागले. नंतर गावात श्री संत यादवबाबा सहकारी दूध संस्था स्थापन करण्यात आली. दिवसेंदिवस दूध व्यवसायात वाढ झाली. पूर्वी दिवसाला अवघे दीडशे लिटर दूधाचे उत्पन्न होते, ते चार हजार लिटरपर्यंत जाऊन पोचले आहे. त्यातून दरमहा एकूण पंधरा ते वीस लाख रुपये शेतकऱ्यांना मिळतात. शेतीपूरक दूध व्यवसाय मिळाल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात मोठी भर पडली. गावच्या विकासासाठी त्याचा चांगला उपयोग झाला. पाणलोट विकासातून गावची भूमी जशी जलसमृध्द झाली तसे उदंड दूध उत्पादनातून शेतकरी आर्थिक दृष्ट्या समृध्द झाले ही सारी पाणलोट विकासाची किमया आहे.

गावात जो बेरोजगार तरुण वर्ग होता, तो तरुणवर्ग विशेषतः दुध व्यवसायाकडे वळला. कुठं तरी नोकरी करुन पारतंत्र्याचे आर्थिक जीवन जगण्यापेक्षा तो आपल्या शेती आणि दुध व्यवसायाचे व्यवस्थापन करतो आहे. नोकरीपेक्षा जास्त पैसे त्याला गावातच मिळतात. आज तो तरुणवर्ग आर्थिक स्वातंत्र्य उपभोगतो आहे.

दुधाचे फॅट वाढावे यासाठी अनेक लोक दुधात भेसळ करतात. काही लोक तर रासायनिक दुध करुन विकतात आणि स्वतःच्या स्वार्थासाठी मुलाबाळांचे आरोग्य धोक्यात आणतात. हे मोठे महापातक आणि गुन्हा आहे; परंतु त्याकडे गांभीर्याने पाहले जात नाही. त्यामुळे दुग्ध व्यवसायात अनेक गैरप्रकार

वाढत आहेत. या व्यवसायाचे पावित्र्य दुष्ट लोभी लोक नष्ट करीत आहेत. त्यांना कडक शासन झाले पाहिजे असे अण्णा हजारे म्हणतात. राळेगणसिध्दीतले शेतकरी दुग्ध व्यवसाय हा भगवान श्रीकृष्णाची पवित्र देणगी समजून करतात. त्यात पाण्यासह काहीही मिसळण्याचे पाप करत नाहीत. राळेगणसिध्दीकरांनी दुग्धव्यवसायातील पावित्र्य आणि पारदर्शकता जपली आहे.

श्री संत यादवबाबा दूध उत्पादक संघाने झालेल्या नफ्यातून आठ लक्ष रुपयांची सुंदर वास्तू उभी केली आहे. दूध कलेक्शन व फॅट तपासणीसाठी संगणकीकृत यंत्र खरेदी केली आहे. त्यामुळे दुधाचे फॅट किती आहे, दूध किती आहेत, त्याला काय भाव मिळाला, त्याचे किती पैसे झाले, याची माहिती त्वरित जागेवर मिळते. तसेच दुधाच्या सर्व रेकॉर्डची संगणकावर नोंद होत असल्याने कोणत्याही महिन्यातील कोणत्याही दिवसाचे रेकॉर्ड ताबडतोब उपलब्ध होते. त्यामुळे दुध व्यवस्थापनातील पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा जपला जातो. शेतकरीही उत्तम गुणवत्ता असलेले दुध डेअरीला घालतात. त्यामुळे दूध व्यवसायातील गैरव्यवहाराला आळा बसला आहे.

संकरित व देशी मिळून गावात ४०० गायी आहेत. २२ म्हशी आहेत. त्यांच्या खाद्यासाठी दूध उत्पादकांना व्यापाऱ्यावर अवलंबून रहावे लागू नये व जास्त भाव द्यावा लागू नये यासाठी गावात अण्णा हजारे यांनी व गावकऱ्यांच्या सहकार्याने पशुखाद्य संस्था स्थापन केली आहे. दूध उत्पादकांना किफायतशीर दरात उत्तम दर्जाचे पशुखाद्य पुरविले जाते. त्याचे पैसे दर पंधरा दिवसांनी होणाऱ्या दुधाच्या हिशेबातून कापून घेतले जातात. त्यामुळे पशुखाद्यासाठी अहमदनगर अथवा घोडनदीला जाण्याचा वेळ, श्रम व वाहतुकीच्या खर्चात शेतकऱ्यांची बचत झाली. रास्त दरात पशुखाद्य मिळू लागल्याने तो खर्च ही

वाचला. शिवाय पशुखाद्यासाठी बाहेर व्यापाऱ्यांकडे जाणारा गावाचा पैसा गावातच राहून. त्याचा दुग्धव्यवसायात सुधारणा करण्यासाठी उपयोग होतो आहे.

दुग्ध व्यवसायात महिलांचाही सहभाग वाढला आहे. त्या गाई-म्हशींचा उत्तमरीत्या सांभाळ करतात. धारा काढणे, दूध डेअरीवर पोचविणे, दुधाचा हिशेब ठेवणे, गोठा स्वच्छ ठेवणे इत्यादी कामे महिला करीत आहेत.

### ४.१५ महिला उध्दाराचे काम :

प्राचीन काळापासून पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीत महिलांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. 'चूल आणि मूल' याचसाठी तिचा जन्म आहे, ती केवळ भोगदासी आहे. उपयोगाची वस्तू आहे. तिला शिक्षण घेण्याचा अधिकार नाही. सार्वजनिक ठिकाणी जाण्याचा अधिकार नाही. तिचा वडिलांच्या किंवा पतीच्या वडिलोपार्जित संपत्तीवर काही हक्क नाही...। या रुढीप्रिय विचारांनी स्त्रीचे जीवन उद्ध्वस्त केले आहे. महिलांना शिक्षणाची दारे बंद होती, त्यामुळे समाजाचे मोठे नुकसान झाले. ज्या घरातील आई अडाणी असेल त्या घरातील मुलेही अडाणी राहतात. स्त्रीला जगन्माता म्हटले जाते. तिच्या ठायी मोठी ईश्वरी ऊर्जा असते. ती प्रेम आणि ममतेचा सागर असते. महापुरुष निर्मिण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते. जिजामातेने उत्तम संस्कार करुन छत्रपती शिवाजीराजासारखा युगपुरुष निर्माण केला. अशी अनेक उदाहरणे जगात आहेत. झाशीची राणी, राणी चेन्नम्मा, माँ शारदा, पंडिता रमाबाई, भारतरत्न मदर तेरेसा, सावित्रीबाई फुले, श्रीमती इंदिरा गांधी यांसारख्या कर्तृत्त्वशाली थोर महिला निर्माण झाल्या. प्राचीन ऋषिमुनींच्या काळातही अनेक ज्ञानसंपन्न विदुषी होत्या. महिलांच्या अंतरंगातील प्रेम, भक्ती, अहिंसा,

सत्यप्रियता, व कर्तृत्व पाहूनच गौतमबुध्दांनी आपल्या शिष्यपरिवारात महिलांचा समावेश केला. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामींनी गौतमबुध्दाचे अनुकरण केले. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या आंदोलनात अनेक महिलांनी निर्भयपणे मोलाची कामगिरी बजावली.

### ४.१६ महिलांची ग्रामपंचायत :

ज्या वेळी राजकारणात महिलांसाठी ३०% आरक्षण नव्हते, त्या काळात राळेगणसिध्दीकरांनी ग्रामसभेत सर्व महिलांना संधी द्यायचा निर्णय घेतला. सदस्यापासून सरपंचापर्यंत सर्व पदांवर महिलांची अविरोध निवड करण्यात आली. त्यांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन व सहकार्य ग्रामस्थांनी केले. पाच वर्षे महिलांनी उत्तम काम करुन राळेगणसिध्दीच्या विकासात मोलाची भर घातली. आजही राळेगणसिध्दीत महिलांना समतेने वागविले जाते. त्यांचा आदरसन्मान राखला जातो. अनेक विवाहादी समारंभांत पुरुष प्रथम पंगतीला बसतात; परंतु राळेगणसिध्दीमध्ये प्रथम पंक्तीला बसण्याचा मान महिलांना आहे. 'ग्रामपरिवर्तन दिना' दिवशी देखील कर्त्वृत्ववान महिलांचा गौर करण्यात येतो. घराघरात समानता पाळली जाते. पुरुषांच्या बरोबरीने महिला ग्रामविकासात सहभागी होतात. ग्रामसभेत निर्भयतेने बोलतात.

### ४.१७ बचतगटांतून आर्थिक उन्नती :

आपला विकास आपणच करावयाचा या जाणिवेतून राळेगणसिध्दीतील महिला जागृत झ ाल्या आहेत. आपल्या हक्कांची जाणीव झाल्याने त्यांचा सामाजिक दृष्टिकोन बदलला आहे, बहुसंख्य महिला साक्षर झाल्या आहेत. अक्षर साक्षरतेबरोबर जलसाक्षरता, कायदा साक्षरता, आर्थिक व्यवहार

साक्षरता त्यांनी आत्मसात केली आहे. सर्व महिलांनी एकत्र येऊन महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम) स्थापन केले आहे. प्रत्येक गटात १५ ते २० या प्रमाणे २५५ ते ३४० महिला बचतगटांच्या सदस्या आहेत. महिला बचतगटांची दर महिन्याला नियमित बैठक होते. बैठकीत आपआपली बचत, महिला जमा करतात. प्रत्येक महिलेचे बचतीचे पासबुक त्वरित भरले जाते. त्यावर आपली किती बचत झाली ते महिलांना समजते. सर्व बचतगटांची एकूण बचत १२ ते १५ लक्ष रुपयांची आहे. प्रत्येक बचतगटाला नावे देण्यात आली आहेत. त्यांची खाती बँकेत उघडण्यात आली आहे. बचतगटांचा सर्व व्यवहार अध्यक्ष, सचिव, खजिनदार या पदांवर असलेल्या महिलांच्या साहाय्याने चालतो. बचतगटांच्या बैठकीत तसे त्यांना अधिकारही देण्यात आले आहेत. सदर बचतगट हे स्वावलंबी बचतगट असल्याने त्यांना नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. एकमेकांच्या विश्वासातून राळेगणसिध्दी परिसरातील जातेगाव, गटेवाडी, घाणेगाव, पिंपळनेर या गावातही पोचले आहे. राळेगणसिध्दीतील महिलांकडून प्रेरणा घेऊन त्या गावांतही महिलांचे ३५ बचतगट स्थापन झाले आहेत. त्यांची बचत २० ते २५ लक्ष एवढी आहे.

### ४.१८ राळेगणसिध्दीतील महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या :

बचतगटांच्या माध्यमातून कर्ज घेऊन महिलांनी दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शिवणकाम, बांगडी व्यवसाय, किराणा व स्टेशनरी, भाजीपाला विक्री इ. व्यवसाय सुरु केले असून त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आहेत. बचतगटातून आपल्या आर्थिक उन्नतीबरोबरच शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, कायदा इत्यादी विषयांबाबत जागृती साधली आहे. कायदेविषयक ज्ञानात भर पडल्याने कुणीही

महिला लग्नाचे कायदेशीर वय झाल्याशिवाय आपल्या मुलामुलींच्या लग्नाचा आग्रह धरत नाहीत. त्यामुळे राळेगणसिध्दीत बालविवाह होत नाहीत. त्यामुळे परिवार नियोजनाबाबतही त्या जागृत आहेत. त्यामुळे राळेगणसिध्दीतील प्रजनन दर १८ ते १९ टक्क्यांवर आला आहे. मासूम ही संस्था महिला बचतगटाचे संमेलन भरवते. या संमेलनात महिलांच्या विचारांची देवाण घेवाण होते. त्यामुळे राळेगणसिध्दीतील महिला स्वातंत्र्याचा अनुभव घेत आहेत. पंख पसरुन त्या प्रगतीकडे झेप घेत आहेत.[१०]

### ४.१९ शैक्षणिक विकास :

भिंगारहून राळेगणसिध्दी येथे अण्णा हजारे आले त्या वेळी गावात शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे शिक्षणासाठी अण्णा हजारे यांना मुंबईला जावे लागले. त्याचे शल्य त्यांच्या मनात बोचत होते. इतर मुलांच्या वाट्याला तसे दिवस येऊ नये. प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क घटणेने दिला आहे. त्यापासून राळेगणसिध्दीतील मुलेंही वंचित राहू नयेत असे त्यांना वाटत होते. म्हणून अण्णा हजारे यांनी शिक्षणाकडे लक्ष पुरविण्याचा ठराव एक दिवस राळेगणसिध्दीत ग्रामसभेमध्ये गावकऱ्यांसमोर मांडला. गावात कोणतेही नवीन काम करायचे झाले तर फक्त स्वतःचाच निर्णय न घेता तो विषय ग्रामसभेत मांडूनच सर्वांच्या सहमतीने निर्णय घेण्याची अण्णा हजारे यांची पध्दती होती. त्यामुळे हाती घेतलेल्या कामात लोकसहभाग वाढतो, असे अण्णा हजारे यांचे मत होते.

१९३२ मध्ये गावात बिगारी ते पहिली हे वर्ग होते. १९६२ मध्ये चौथीपर्यंत वर्ग सुरु झ ाला. चारही वर्ग एकाच खोलीत भरायचे. चारही वर्गांसाठी एकच शिक्षक होता. मुलं चौथीपर्यंत शिकायची आणि पुढे शिक्षणाची सोय नसल्याने घरी बसायची. गुरांमागं जायची. त्यांच्या पालकांना

शिक्षणाचे महत्त्व वाटत नव्हतं. लिहायला - वाचायला आले म्हणजे पुष्कळ शिक्षण झालं असे गावकरी समजायचे. ग्रामसभेत ठरल्यानुसार पाचवी, सहावी, सातवीपर्यंतचे वर्ग सुरु झाले. पहिली ते चौथीतून शाळा सुटलेली मुले पुन्हा शाळेत परतली. हळूहळू मूलांची संख्या वाढू लागली. काही काळातच सातवीपर्यंतचे वर्ग सुरु झाले. देवळात, चावडीत वर्ग भरु लागले. नंतर नवीन वर्ग बांधण्यात आले. सातवीनंतर गावात हायस्कूलची सोय नव्हती. मुलांना बाहेरगावी शिक्षणासाठी जावे लागे. काही मुले सातवीपर्यंतच शिकत होती. ही अडचण जाणून ग्रामसभेत श्री संत यादवबाबा शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेच्या वतीने श्री संत निळोबाराय विद्यालय सुरु झाले. विद्यालयास पाचवीपासूनचे वर्ग जोडून दहावीपर्यंतचे वर्ग सुरु करण्यात आले, ते साल १९८० हे होते.

मुख्याध्यापक श्री. ठकाराम राऊत हे आदर्श शिक्षक गावाला लाभले. त्यांनी आपला शिक्षकी पेशा केवळ पोट भरण्यासाठी नोकरी न मानता सेवा म्हणून समर्पण भावनेने काम केले. मुख्याध्यापक म्हणून श्री. संत निळोबाराय विद्यालय नावारुपाला आणले. शंकार पाटील पठारे, सावळेराम पाटीलबा पठारे, बाबूराव काशिनाथ हजारे, बाबूराव मुरलीधर दसरे व भवरीलाल ओस्तवाल या पाच दानशूर शेतकऱ्यांनी आपली दहा एकर जमीन शाळेसाठी दान केली. त्यांचे गावावर मोठे ऋण आहे. त्या जागेवर श्रमदान व वर्गणीतून २५ लाख रुपयांची शाळेची भव्य इमारत उभी राहिली. त्यानंतर २२ लक्ष रुपयांची वसतिगृहाची भव्य वास्तूही श्रमदान व लोकवर्गणीतूनच आकारास आली. त्यामुळे बाहेरगावच्या विद्यार्थ्यांची सोय झाली 'श्री संत यादवबाबा विद्यार्थी वसतिगृह' असे त्याचे नामकरण करण्यात आले.

शाळा आणि हायस्कूलसाठी गावकऱ्यांनी कुणाकडूनही देणग्या स्वीकारल्या नाहीत. तत्कालीन राज्यपाल लतीफ यांच्या आग्रहामुळे राज्य शासनाची चार लाख रुपयांची देणगी गावकऱ्यांना

वसतिगृहाच्या बांधकामासाठी स्वीकारणे भाग पडले. एवढाच अपवाद वगळता कुणाकडूनही एक पैशाची देणगी न स्वीकारता गावकऱ्यांनी आपल्या हिमतीवर शैक्षणिक विकासाच्या वास्तू उभ्या केल्या आहेत. त्यामुळे आपल्या शाळेबद्दल गावकऱ्यांना आपुलकी वाटते. शाळेच्या कामात ते सतत लक्ष पुरवितात. राळेगणसिध्दीने शैक्षणिक विकासासह सर्व कामे स्वावलंबनातून केली.

ब्रिटिशांना आपले प्रशासन चालविण्यासाठी इंग्रजी बोलता येणारे कारकून पाहिजे होते. त्यासाठी त्यांनी जी शिक्षणपध्दती सुरु केली, तीच पध्दती आजही चालू आहे. शिक्षण हे श्रमावर आधारित हवे. शिक्षणाव्दारे जातपात न मानणारा, मानवता हाच धर्म मानणारा व आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या उदरनिर्वाहासाठी करताना त्याने समाजाचे दैन्य व दु:ख दूर करावे, अशा पध्दतीने शिक्षणातून स्वतंत्र भारताचा आदर्श नागरिक घडविला जावा ही महात्मा गांधींची विचारधारा होती; परंतु तिला आजच्या शिक्षण पध्दतीत तिलांजली देण्यात आली. स्वातंत्र्याच्या ६१ वर्षांनंतर शिक्षणातून आपल्या देशात अनेक इंजिनिअर झाले, डॉक्टर, वकील झाले, संशोधक निर्माण झाले. ही भूषणावह गोष्ट आहे; परंतु अनेक सरकारी इंजिनिअर खडी - सिमेंट खाऊन आपले खिसे भरण्यात मग्न आहेत. वैद्यकीय पेशात खोकला येत असला तरी सलाईन लावण्याची वृत्ती वाढत चाललेली आहे. सेवाभाव राहिला नाही. शिक्षणासह सर्व क्षेत्रात भ्रष्ट आचार - विचारांची लागण झाली आहे. गरीब - श्रीमंतांतील व जातीधर्मातील तेढ वाढत चालली आहे. शहरी धनिकांची मुलं इंग्रजी माध्यमात व खेड्यातील शेतकरी, शेतमजुरांची मुलं मराठी माध्यमात शिकत आहेत. इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमामुळे पाश्चात्त्य संस्कृतीचा पगडा वाढत आहे.

प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे, तरच मुलांची प्रतिमा बहरते. विदेशी भाषेच्या माध्यमामुळे मुलांच्या मेंदूवर व मज्जासंस्थेवर ताण पडतो. पुढे त्याचा विपरीत परिणाम होतो.

त्याची प्रज्ञा आणि प्रतिभा खुंटते. इंग्रजी माध्यमातून शिकलेली मुले धनवंत होतील, मात्र गुणवंत होतीलच असे सांगता येत नाही असे अण्णा हजारे म्हणतात. आपल्या देशातील अनेक जगप्रसिध्द शास्त्रज्ञ आपल्या मातृभाषेच्या माध्यमातून शिकले; त्यामुळे त्यांचा बौध्दिक विकास झाला. त्यामुळे इंग्रजी माध्यमाचे स्तोम माजविण्यात काही अर्थ नाही. रशिया, जपान, जर्मनी, चीन या देशांत मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. त्यामुळे ते देश पिछाडलेले नाहीत, तर जगात सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. पाचवीपासून तुम्हाला इंग्रजी भाषा शिकता येते; परंतु सर्व विषयांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून देणे अयोग्य आहे असे गांधींचे मत होते.

पदव्यांच्या माळा गळ्यात घातल्याने माणूस खूप ज्ञानी झाला हा समज चुकीचा आहे. शिक्षणातून सामाजिक बांधिलकीची जाणीव झाली पाहिजे. मूल्याधिष्ठित, श्रमाधिष्ठित व संस्कारक्षम शिक्षणातून आदर्श नागरिकांची नवी पिढी निर्माण झाली तरच स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर होण्यास मदत होईल. आज खेड्यात दहावीपर्यंत शिकलेला मुलगा रानातून गवताचा भारा डोक्यावर आणणारी आई दिसली, की पळत जातो, तिच्या डोक्यावरचा भारा आपल्या डोक्यावर घेतो आणि श्रम आणि ओझे कमी करतो. हाच विद्यार्थी कॉलेजात गेला, की कॉलेजकुमार बनतो. आई ओझ्याने वाकली तरी आपली अप्रतिष्ठा होईल म्हणून तिच्या डोक्यावरील ओझे घ्यायला तो धावत नाही. पुढे तो खूप शिकतो, गाव सोडतो, देश सोडतो, परदेशात जातो, भरपूर पैसा कमवतो; परंतु या मातृभमीत मी शिकलो. समाजाच्या पैशावर माझे शिक्षण झाले. ज्या मातापित्यांनी हाडाची काडे करुन त्याला शिकवलं त्या सर्वांना तो विसरतो. हा त्याचा शुध्द कृतघ्नपणा आहे असं म्हटलं तर वावगं ठरु नये असे अण्णा हजारे म्हणतात. आजच्या मूल्यहीन शिक्षणातून माणूस कृतज्ञ बनण्याऐवजी कृतघ्न बनत आहे.

पुढील काळात मानवतावादी संस्कारक्षम शिक्षणाचा विचार कुटुंबापासून करायला पाहिजे. संस्कार केंद्रे उघडून मनावर खऱ्या अर्थाने संस्कार होणार नाहीत. प्रत्येक कुटुंब संस्कार केंद्र झाले पाहिजे. मातीच्या गोळ्याप्रमाणे बालवयातच बालमनावर आपण संस्कारक्षम संस्कार करुन आकार दिला पाहिजे. ते काम पालक व शिक्षकांनी केले पाहिजे. राळेगणसिध्दीत तो प्रयत्न होतो आहे. ज्या शिक्षणातून सामाजिक बांधिलकी असलेला माणूस तयार होत नाही, ते शिक्षण कुचकामी होय; असे स्वामी विवेकानंद म्हणतात. या आणि महात्मा गांधींच्या आदर्श शैक्षणिक संकल्पनेचा विचार करुनच राळेगणसिध्दीच्या शाळेत मुलांना घडविले जाते, असे अण्णा हजारे म्हणतात.

## ४.२० नापासांची शाळा :

अनेक विद्यार्थी परीक्षेत नापास होतात. अपयश सहन न झाल्याने काही विद्यार्थी आत्महत्यांचा मार्ग स्वीकारतात. काही विद्यार्थी निराश होऊन घरदार सोडून परागंदा होतात. आपली गुणवत्ता सांभाळण्यासाठी कोणत्याही शाळा त्यांना आपल्या दारात उभे करत नाहीत. घरातूनही त्यांची उपेक्षा होते. असे विद्यार्थी खचून जातात. त्यांचे भवितव्य उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असते. अशा विद्यार्थ्यांना श्री संत निळोबाराय विद्यालयात प्राधान्याने प्रवेश देऊन त्यांना आधार देण्याचे श्री संत यादवबाबा शिक्षण प्रसारक मंडळाने ठरवले. १९८९ पासून श्री संत निळोबाराय विद्यालयात खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांती सुरु झाली. विविध कारणांनी नापास झालेले विद्यार्थी, बालवयात कुसंगतीने व्यसनाधीन होऊन वाया गेलेले विद्यार्थी, पालक नोकरीस असल्याने त्यांच्या दुर्लक्षातून बिघडलेली मुले, अतिलाड केल्याने बिघडलेली मुले ही समाजातून बहिष्कृत केली जातात. वास्तविक ही मुले बुध्दीने चाणाक्ष असतात; परंतु

या बुध्दीचा वापर ते गुंडगिरीसाठी करु लागतात. अनेकवेळा नापास झालेल्या विद्यार्थ्यांना शाळा काढून टाकतात. वडील वारलेले असल्याने काही मुले केवळ आईच्या आश्रयाखाली संस्कारित होत नाहीत. अशा विविध कारणांमुळे वाया गेलेल्या; परंतु चाणाक्ष बुध्दी असलेल्या मुलांना कोणत्याही ठिकाणी प्रवेश मिळत नाही. गुणवत्ताधारक मुलांना सगळीकडे सहज प्रवेश मिळतो; परंतु नापास आणि उनाडपणाचा शिक्का माथी बसलेली ही मुले शिक्षणातून बाजूला फेकली जातात. या सर्व गोष्टींचा अण्णा हजारे यांनी बारकाईने विचार केला. अशा मुलांच्या पालकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. त्या वेळचे मुख्याध्यापक श्री. ठ. ल. राऊत यांच्याशी अण्णा हजारे यांनी चर्चा केली. त्यानंतर अण्णा हजारे यांनी व त्यांच्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या सदस्यांनी क्रांतिकारक निर्णय घेतला. नापासांना प्रवेश, उनाड मुलांना प्रवेश. सगळीकडे गुणवत्तेच्या आधारावर प्रवेश दिला जात असताना अण्णा हजारे यांच्या शाळेत नापास असणाऱ्यांना सर्वांत प्रथम संधी देण्यात आली. शैक्षणिक स्तरावर सुरु केलेला हा अभिनव प्रयोग कल्पनेच्या पलीकडे यशस्वी झाला आणि त्यानंतर राळेगणसिध्दीची शाळा ही 'नापासांची शाळा' म्हणून प्रसिध्द झाली. या शाळेच्या प्रशस्त अशा सुमारे ३२ लक्ष रुपये मूल्य असलेल्या इमारतीसाठी विद्यार्थ्यांनी आणि गावकऱ्यांनी मोठे श्रमदान केले. आज श्रीसंत निळोबाराय विद्यालयात महाराष्ट्रातल्या अनेक शहरांतील नापास, उनाड विद्यार्थ्यांनी प्रगतीचे उत्तम शिखर गाठले आहे.

### ४.२१ शैक्षणिक विकासाची पंचसूत्री :

नापासांची शाळा सुरु केल्यानंतर प्रत्येक वर्गाच्या दोन तुकड्या करण्यात आल्या. एक तुकडी हुशार विद्यार्थ्यांची तर दुसरी तुकडी नापास आणि उनाड मुलांची. आता खरी कसोटी होती शिक्षक

वर्गाची; परंतु येथील मेहनती शिक्षकांनी टाकलेली जबाबदारी समर्थपणे पेलली आणि हा प्रयोग यशस्वी करुन दाखविला. हे करत असताना फक्त नापास विद्यार्थ्यांचा अभ्यास सुधारणे हा संकुचित दृष्टिकोन नव्हता तर या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधून त्यांना सुसंस्कारित बनविणे हा व्यापक हेतू होता. हे साधण्यासाठी विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पंचसूत्री कार्यक्रम राबविण्यात आला.

१. बलसंवर्धन

२. श्रमसंस्कार

३. शीलसंवर्धन

४. प्रज्ञाविकास

५. देशप्रेम

ही पंचसूत्री आणि त्यावर आधारित उपक्रम राबवून जणू एक संस्कारकेंद्रच सुरु करण्यात आले. या पंचसूत्रीवर आधारित उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळाली.

### *१. बलसंवर्धन :-*

शरीरसंपदा हीच खरी जीवनभर पुरणारी संपत्ती आहे. त्यामुळे राळेगणसिध्दीमधील विद्यालयात बलसंवर्धनावर भर देण्यात आला. प्रशस्त क्रीडांगण आणि सर्व प्रकारच्या खेळांच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या. व्यायाम आणि विविध खेळांच्या माध्यमातून येथील विद्यार्थ्यांचे शरीर सक्षम आणि बलवान होऊ लागले. तसेच संपूर्ण संधी उपलब्ध झाल्याने क्रीडाक्षेत्रात विद्यार्थ्यांनी नैपुण्य प्राप्त केले.

त्यामुळे विद्यालयाचे काही विद्यार्थी आज आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत आपले कौशल्य सिध्द करीत आहेत. त्यातील काही प्रातिनिधिक यशवंत विद्यार्थी खालील प्रमाणे आहेत.

१. वैभव बाळासाहेब वाघ - हँडबॉल : आंतरराष्ट्रीय स्तर
२. संदीप जिजाबा तरटे - नेमबाजी : आंतरराष्ट्रीय स्तर
३. कु. आदिका गणपत मापारी - धावणे : आंतरराष्ट्रीय स्तर

***२. श्रमसंस्कार :-***

श्रमाला खरे महत्त्व आहे. गावाच्या कार्यामधून श्रमदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजू लागले. विद्यालयातील सर्वच विद्यार्थी सातत्याने श्रमदान करु लागले. त्यामध्ये ग्रामसफाई, शौचालय सफाई, वृक्षारोपण ही कामे होऊ लागली. त्यातूनच पर्यावरणासंबंधी विद्यार्थ्यांच्या मनात जागृती झाली. विद्यार्थ्यांनी श्रमदानातून लावलेले आणि वाढविलेले लाखो वृक्ष आज राळेगणसिध्दीत दिसतात. त्यामुळेच राळेगणसिध्दीचा संपूर्ण शिवार हिरवागार दिसतो. अशा प्रकारच्या श्रम संस्कारामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे काम करण्याची लाज वाटत नाही.

***३. शीलसंवर्धन :-***

माणसाचे आचार विचार शुध्द असतील आणि चारित्र्य निष्कलंक असेल तरच तो आदर्श नागरिक होऊ शकतो. ही शिकवण सातत्याने शाळेमध्ये विद्यार्थ्यांना दिली. त्यातून आणि विद्यालयातील विविध उपक्रमांतून उनाड विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होऊ लागले. त्यांच्या वर्तनात सुधारणा होऊ लागली. खोड्या करणे, चोऱ्या करणे, तंबाखू-गुटखा खाणे, धूम्रपान करणे, गुंडागर्दी अशा अनेक वाईट सवयींच्या आहारी गेलेले विद्यार्थी या विद्यालयात सुधारु लागले आणि चांगल्या गुणांनी पास होऊ लागले. अपेक्षित वर्तनबदल हे या संस्काराचे खरे यश आहे.

### ४. *प्रज्ञाविकास :-*

वरीलप्रमाणे चांगले संस्कार करीत असतानाच विद्यार्थ्यांच्या प्रज्ञाविकासाकडे विद्यालयाने लक्ष दिले. त्यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविले. अप्रगत विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्रपणे मार्गदर्शनाचे वर्ग चालविले. परिणामी अप्रगत विद्यार्थ्यांच्या अभ्यासात प्रगती झाली. त्यामुळे नापास विद्यार्थ्यांना प्रवेश देऊनही विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्क्यांपर्यंत लागतो हेच त्यामगचे खरे यश आहे.

### ५. *देशप्रेम :-*

बलसागर भारताचे स्वप्न साकार करायचे असेल तर खऱ्या अर्थाने या विद्यार्थ्यांवर देशप्रेमाचे संस्कार होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने विद्यालयात प्रयत्न केले जातात. गीतमंच, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय परिपाठ इत्यादी प्रभावी उपक्रम त्यासाठी राबविले जातात. त्याचा इष्ट परिणाम होतो. विद्यार्थ्यांच्या मनावर देशप्रेमाचे संस्कार होतात. त्यामुळेच आजपर्यंत विद्यालयाचे शेकडो विद्यार्थी सैन्यात भरती झाले आहेत.

## ४.२२ उच्च माध्यमिक विद्यालय :

राळेगणसिध्दी येथे शालान्त शिक्षणापर्यंतची सुविधा निर्माण झाली; परंतु उच्च शिक्षणासाठी मात्र विद्यार्थ्यांना बाहेरगावी जावे लागे. या कारणाने अनेक पालक आपल्या मुलांना पुढील शिक्षणासाठी पाठवीत नसत. यात मुलींचे प्रमाण अधिक होते. दहावीनंतर बहुतांश कमी वयातच विवाह केले जात. त्यामुळे पुढील शिक्षणापासून त्या मुलींना कायमचे वंचित राहावे लागे. या सर्व समस्यांचा विचार करुन

राळेगणसिध्दी येथे कला शाखा, विज्ञान शाखा, सेमी इंग्रजी असलेले उच्च माध्यमिक विद्यालय सुरु केले. त्यामुळे राळेगणसिध्दीमध्येच उच्च शिक्षणाची सुविधा निर्माण झाल्याने त्याचा सर्वांत जास्त फायदा गावातील व परिसरातील मुलींना झाला. आज राळेगणसिध्दीत शेकडो मुले - मुली उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

अशा प्रकारे सर्व शैक्षणिक समस्यांच्या मुळाशी जाऊन विविध शैक्षणिक उपक्रम अण्णा हजारे यांनी राळेगणसिध्दी येथे राबविले. विविध अभिनव प्रयोग केले. त्यामुळे शैक्षणिक प्रवाहातून विविध कारणांमुळे बाहेर फेकल्या गेलेल्या मुलांना पुन्हा शैक्षणिक सुविधा प्राप्त झाल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शाळा गळती थांबवण्यास प्रभावीपणे मदत झाली. वाया गेलेली मुले व नापास झालेली मुले पुन्हा मुख्य प्रवाहात आली. अशा सर्व विद्यार्थ्यांवर या ठिकाणी विविध माध्यमातून सुसंस्कार होऊन त्यातून उद्याचे आदर्श नागरिक तयार होऊ लागले, असे अण्णा हजारे म्हणतात.

राळेगणसिध्दीची शाळा म्हणजे ऋषिमुनींच्या व महात्मा गांधींच्या आश्रमशाळेचा आधुनिक आदर्श आहे.[११]

### ४.२३ ग्रामस्वच्छता / ग्रामआरोग्य :

महात्मा गांधींनी स्वावलंबी आदर्श गावनिर्मितीत स्वच्छता आणि आरोग्याला महत्त्वाचे स्थान दिले आहे. ग्रामआरोग्याचा विचार करताना आजारी पडून औषधे घेण्यापेक्षा स्वच्छता बाळगून आजारी पडू नये याची काळजी आपण घेतली पाहिजे, असे अण्णा हजारे म्हणतात. डॉक्टरवर अवलंबून न राहता स्वच्छता, आहार, विहार, व्यायाम व निसर्गोपचारातून आपले ‘आरोग्य’ आपण राखले पाहिजे असे

अण्णा हजारे यांचे मत आहे. आपले आरोग्य आपल्या हाती ही गांधींच्या ग्रामआरोग्याची संकल्पना होती. याच संकल्पनेनुसार राळेगणसिध्दीत आरोग्य राखण्याचे काम करण्यात आले. राळेगणसिध्दीत जागोजागी उकिरड्यांचे ढीग साचले होते. लोक रस्त्यालगत शौच करायचे. गावात विहिरीला पायऱ्या होत्या. विहिरीत उतरुन लोक अंघोळ करायचे. महिला धुणी धुवायच्या. पालापाचोळा विहिरीत साठायचा, तो कुजून जायचा. या सर्व प्रकारांनी विहिरीचे पाणी दूषित झाले. त्याच पाण्याचा लोक पिण्यासाठी वापर करीत. त्यामुळे संपूर्ण गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले. ९५% लोकांना नारु झाला होता. लहानमोठ्यांसह बहुतांश लोकांना खरुज-नायट्यांनी ग्रासले होते. बालमृत्यूचे प्रमाणही अधिक होते. महिलांच्या आरोग्यांच्याही अनेक समस्या होत्या.

दूषित पाणी हा खेड्यातील आरोग्याचा एक प्रमुख घटक आहे. १९७५ मध्ये कामास सुरुवात करताना स्वच्छतेचे महत्त्व अण्णा हजारे यांनी सर्वप्रथम गावकऱ्यांना पटवून दिले. त्यानुसार ग्रामस्थांनी रस्त्यातले उकिरडे काढून रस्ते स्वच्छ केले. विहिरीला असलेल्या पायऱ्या प्रथम काढून टाकण्याचा निर्णय अण्णा हजारे यांनी व गावकऱ्यांनी एकमताने घेतला. बांधबंधाऱ्यांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरले. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली. पिण्यासाठी शुध्द पाणी उपलब्ध व्हावे यासाठी ठिकठिकाणी बोअर खोदण्यात आले. बोअरला भरपूर पाणी लागले. त्यावर हँडपंप बसविण्यात आले. लोक बोअरव्दारे भूगर्भातील स्वच्छ पाणी प्यायला लागले. तेव्हापासून नारुची साथ आटोक्यात आली. आता नारु आणि साथीच्या रोगांचे राळेगणसिध्दीतून उच्चाटन झाले आहे.

अस्वच्छतेमुळे गावात विविध चर्मरोगांचे प्रमाण जास्त होते. प्रत्येक परिवाराला शरीराच्या स्वच्छतेबरोबर कपड्यांची स्वच्छता, आपल्या घराची व परिसराची स्वच्छता राखण्याबाबत लोकशिक्षण

व लोकजागृती करण्यात आली. घरातील सांडपाणी रस्त्यावर यायचे. पाण्याची डबकी साचायची. त्यामुळे डासांसारखे आरोग्यघातक जीवजंतू निर्माण व्हायचे. त्याला आळा घालण्यासाठी प्रत्येक घरासमोर शोषखड्डे खणण्यात आले. यात सांडपाणी जिरविण्यात आले. त्यामुळे मलेरियासारख्या आजारांना आळा बसला. गुरांचे गोठे स्वच्छ करण्यात आले. शेतकऱ्यांच्या उकिरड्यांची व्यवस्था गावाबाहेर करण्यात आली. त्यामुळे होणाऱ्या माशा व चिलटांचा उपद्रव कमी झाला. पूर्वी गावात लोक कोठेही शौचास बसायचे. मुले तर रस्त्यावरच शौच करायचे. गावात प्रवेश केला, की दुर्गंधीमुळे बाहेरचे लोक नाक दाबून गावात यायचे. आता घरटी शौचालये बांधण्यात आली आहेत. त्या काळात शौचालयासाठी सरकारी अनुदान नव्हते. ग्रामस्वच्छता अभियान नव्हते. सारी कामे ग्रामस्थांनी लोकवर्गणी व श्रमदानातून केली.

लहानपणापासून मुलांना स्वच्छतेची सवय लागली, तर 'लेकी बोले सुने लागे' या उक्तीनुसार त्याचा परिणाम परिवारावर होतो. म्हणून शाळेतील मुलांना अण्णा व त्यांच्या ग्रामस्थ सहकाऱ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व प्रतिपादन केले. मुले आपल्या शरीर व कपड्यांबरोबर सार्वजनिक स्वच्छता राखायला लागली. हातात झाडू घेऊन रस्ते झाडायला लागली. त्याचा परिणाम प्रौढ गावकरी व तरुणांवर झाला. प्रत्येकजण घरदार, अंगण व परिसर स्वच्छ करण्याची दक्षता घेऊ लागला. हे राळेगणसिध्दीत स्वच्छतेबद्दल झालेले मोठे परिवर्तन होते, आपल्या घरातला कचरा दुसऱ्याच्या घरात लोटणे आणि कुठेही कोपरा दिसला, की लघुशंकेला बसणे, रस्त्यावर थुंकणे आपला जन्मसिध्द हक्क आहे असे भारतीय समजतात. शौचालय असूनही शौचालयाचा वापर खेड्यातले लोक करतातच असे नाही. अनेक

गावांत शौचालये गोवऱ्या, सरपण व अडगळीचे सामान ठेवण्याची खोली म्हणून वापरली जातात. जिथे जाईल तेथे घाण करण्यात आपणास कोणतीही खंत वाटत नाही. याला शहरेही अपवाद नाहीत.

स्वातंत्र्य मिळून ६२ वर्षे झाली, तरी आपण स्वच्छतेचे धडे पाश्चिमात्त्यांकडून शिकत नाहीत त्यांच्या चंगळवादी व भोंगवादी विचारसरणीचे अनुकरण करतो; परंतु चांगल्या गोष्टी शिकत नाहीत. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामस्वच्छता अभियान व केंद्र सरकारच्या निर्मलग्राम योजनेतून खेड्यापाड्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटू लागले आहे ही समाधानाची बाब होय असे अण्णा हजारे म्हणतात.

राळेगणसिध्दीबद्दल बोलायचे तर स्वच्छता आता प्रत्येक परिवाराच्या हाडीमांसी खिळली आहे. आपल्या घराबरोबर सार्वजनिक स्वच्छतेबाबतही लोक दक्ष आहेत. गावात तुम्ही कुठेही फिरा, रस्ते स्वच्छ दिसतील. कुठेही कचरा साठलेला दिसणार नाही. स्वच्छता हा आरोग्याचा पाया आहे. हा पाया राळेगणसिध्दीकरांनी मजबूत केला आहे. स्वच्छतेबरोबरच शारीरिक व्यायाम, खेळ यात मुले रमतात. वसतिगृहातील मुले पहाटे साडेपाचला उठतात, पाच किलोमीटर धावतात, नंतर व्यायामशाळेत व्यायाम करतात. सायंकाळी क्रीडांगणावर विविध खेळ खेळतात. यामुळे सर्व मुले निरोगी जीवन जगतात. गावातली मुलेही त्यात सहभागी होतात. आपल्या परिसराची व घरादाराची स्वच्छता राखतात. महिलाही स्वच्छतेच्या बाबतीत आघाडीवर आहेत. गर्भपोषण, आरोग्यदायी प्रसूती व बालकांच्या होणाऱ्या आजारांबाबतचे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले आहे. त्यामुळे पूर्वी जे मोठ्या प्रमाणात बालमृत्यूचे प्रमाण होते, ते आता शून्यावर आले आहे. राळेगणसिध्दी आरोग्यसंपन्न झाले. कसलेही प्रदूषण गावात नाही. गाव हिरव्या वृक्षवल्लींनी नटलेले आहे. त्यामुळे प्रत्येकाला शुध्द हवेचा लाभ होतो. स्वच्छतेबरोबरच मुलेमुली, तरुण, प्रौढ, सर्वांची मने स्वच्छ झाली आहेत. गावात सहसा कुणी आजारी

पडत नाही. त्यामुळे गावात दवाखाना नाही. २/३ डॉक्टरांनी गावात दवाखाने खोलले होते; परंतु रुग्ण नसल्याने त्यांना आपला व्यवसाय बंद करावा लागला. किरकोळ आजारावरील औषध विक्रीची दोन - तीन मेडिकल दुकाने गावात आहेत; परंतु त्यांचा व्यवसाय भरपूर प्रमाणात चालत नसल्याचे ते सांगतात. स्वच्छ मनाच्या लोकांचे स्वच्छ गाव म्हणून राळेगणसिध्दी लौकीक पावले आहे. स्वच्छता तिथे परमेश्वर असे गांधीं म्हणतात. राळेगणसिध्दी आता एक मंदिरच बनले आहे. त्या मंदिरातील स्वच्छ मनाचे गावकरी मला ईश्वरासमान आहेत असे अण्णा हजारे म्हणतात.[१२]

## ४.२४ परिवारनियोजन :

आज जगाच्या पाठीवर वाढती लोकसंख्या व पर्यावरणाचा ऱ्हास या दोन मोठ्या समस्या आहेत. वाढत्या लोकसंख्येतून पर्यावरण ऱ्हासाची समस्या निर्माण झाली आहे. त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्येतून अनेक समस्या निर्माण होत आहेत. आपल्या देशाचा विचार केला तर चीनच्या खालोखाल लोकसंख्या असलेला भारत जगातल्या दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. ऑलिंपिकसारख्या जागतिक क्रीडास्पर्धेत जपानसारखे राखेतून प्रगती केलेले देश शेकडो सुवर्णपदकांची कमाई करतात; परंतु स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांच्या कालखंडात आपणास इतर देशांच्या तुलनेत ऑलिंपिक सुवर्णपदक पटकावता आले नाही. लोकसंख्यावाढीत मात्र आपण नेत्रदीपक यश मिळवले आहे. चीनमध्ये झ ालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी विविध खेळात सुवर्ण, रौप्य, ताम्र पदके पटकावली आहेत, ही समाधानाची बाब आहे.

१९४७ मध्ये भारताची लोकसंख्या ३५ कोटी होती. शेकडो वर्षांपासून हाच लोकसंख्येचा आकडा होता ; परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ५३ वर्षात २००० मध्ये आम्ही १०० कोटींवर पोचलो.

लोकसंख्यावाढीचा वेग हा असाच चालू राहिला तर पंचवीस वर्षांत लोकसंख्या १५० कोटींवर पोचून भारतासमोर अनेक समस्या निर्माण होतील असे अण्णा हजारे म्हणतात.

कार्बन उत्सर्जनामुळे जलवायू परिवर्तन झाले आहे. जंगले तुटत आहेत. पर्यावरण बिघडत चालले आहे. मॉन्सून लहरी बनत चालला आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे, त्याचा पीकपाण्यावर परिणाम होत आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खालावते आहे मग या वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी जल, अन्न, वस्त्र, निवारा याची सोय कशी होणार ? हा भविष्यातला यक्षप्रश्न आहे. मग यातून आणखी विकास सुरु होऊन निसर्गाचा विनाश घडणार आहे. त्याचा हवामानावर विपरीत परिणाम होणार आहे. वाढते कार्बन उत्सर्जन व पृथ्वीचे वाढते तापमान यामुळे येत्या पन्नास वर्षांत मॉन्सूनचे पृथ्वीवरील अस्तित्व संपणार आहे. त्या वेळी भारतच नव्हे तर सारे जग ओसाड वाळवंट बनेल, असे शास्त्रज्ञांचे संशोधन आहे. भविष्यात पृथ्वी जीवन जगण्यायोग्य ग्रह राहणार नाही; म्हणूनच जग आज चंद्राकडे डोळे लावून बसले आहे. चंद्रावर पाण्याच्या अस्तित्वाचा शोध लागला आहे. त्यामुळे भविष्यात चंद्रावर मानवी वस्ती करुन राहता येईल की नाही याचे संशोधन चालू आहे. अंतराळातील जीवन जगण्यास योग्य ग्रहगोलांचा तपास शास्त्रज्ञांनी चालविला आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे पृथ्वी आज संकटात आहे. जगाचा विचार न करता आपण आपल्या देशापुरते व गावापुरते पाहिले तर जे चित्र समोर येते, ते भयावह आहे. असंख्य खेड्यांत आज पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. जीवनावश्यक वस्तूंचे भाव आकाशाला भिडले आहेत. कितीही शाळा निघाल्या तरी मुलामुलींना प्रवेश मिळणे अवघड झाले आहे. खेड्यात पाणी नाही. पोट भरण्याचे साधन सहज उपलब्ध नाही. म्हणून स्थलांतरितांचे लोंढे शहरात जाऊन वसले आहेत. पुणे, मुंबई, दिल्ली, कोलकत्ता यांसारख्या अनेक शहरांची लोकसंख्या महापुरासारखी फुगली आहे. घरांचे भाव गगनाला

भिडले आहेत. गरीब लोक झोपडपट्टीत राहून नरकवासाचे जीवन जगत आहेत. सर्वांच्या सुविधा पुरवता, पुरवता शासन आणि नगरपालिका, महानगरपालिका असमर्थ ठरत आहेत. शहरात मुंग्यांसारखी गर्दी झ ाल्याने चालणे अवघड झाले आहे. शहरी माणसांचे जीवन आरोग्य धोक्यात आले आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पुरविण्यासाठी पेट्रोल, डिझेल, कोळसा व पाण्याचा उपसा अधिक गतीने वाढतो आहे. या इंधनाचा भूगर्भातील साठा काही वर्षांत संपणार आहे. ग्रामीण भागात वाढत्या लोकसंख्येचा भार जंगलावर पडतो आहे. त्यामुळे वृक्षवनस्पती नष्ट होत आहेत. त्यामुळे भावी पिढ्यांचे आयुष्य अंधकारमय होणार आहे. खेड्यातल्या माणसांना इंधनाचा पर्याय दिला पाहिजे. त्यानंतर त्यांना वृक्षतोड करु असे सांगण्याचा हक्क आपल्याला प्राप्त होईल असे अण्णा हजारे म्हणतात. आज भारतात राहणाऱ्या सर्व भारतीयांना परिवार नियोजन कायदा सक्तीचा करुन वाढत्या लोकसंख्येला आळा घातला पाहिजे. चीनप्रमाणे कडक कायदे केले पाहिजेत; परंतु राज्यकर्त्यांना आपल्या खुर्चीची चिंता वाटते आहे. म्हणून सक्तीचा कायदा होत नाही, ही उद्याच्या भारताच्या भवितव्यासाठी चिंतनीय बाब आहे.

राळेगणसिध्दीत काम करताना वाढत्या लोकसंख्येचे सर्व दुष्परिणाम अण्णा हजारे यांच्या लक्षात आले होते. गावाचा कितीही विकास झाला आणि लोकसंख्या वाढली तर विकासाला काहीही अर्थ उरणार नाही. ते टाळण्यासाठी परिवार नियोजनाचे चिंतन अण्णांच्या मनात सुरु झाले. लोकांत, गावकऱ्यात परिवार नियोजनाबाबत जागृती होणे गरजेचे आहे. हा देवाचा पानमळा आहे. तो खुडायचा नसतो. या अंध:श्रध्देचा पगडा काही लोकांच्यावर होता. त्यांनी परिवार नियोजनाला विरोध केला. मग अण्णा हजारे यांनी ग्रामसभेत निर्णय घेण्याचे ठरविले. एकापेक्षा अधिक अपत्ये झाली तर वाटणीवरुन भावाभावात कलह सुरु होतो. बांधाबांधावरुन खूनही पडतात. जर एकच मुलगा असेल तर वाटणीचा प्रश्नच येत

नाही. कलहाचा प्रश्नच येत नाही. संपुर्ण कुटुंब सुखासमाधानात राहते. हा विचार ग्रामसभेत अण्णा हजारे यांनी मांडला. पूर्वीच्या कटू अनुभवामुळे हा विचार ग्रामस्थांना पटला. तसेच ज्यांना एकापेक्षा जास्त मुले आहेत त्यांनी पुढे पाळणा थांबवला नाही तर त्यांना सरकारी नोकरीचा लाभ मिळू दिला जाणार नाही, असा निर्णय ग्रामसभेत झाला. तेव्हा लोकांनी परिवार नियोजनाच्या शस्त्रक्रिया करुन घेतल्या.

ग्रामसभेत परिवार नियोजनाचा निर्णय घेण्यापूर्वी अण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांनी गावातील प्रत्येक परिवाराची पाहणी केली. तेव्हा गरीब परिवारात जन्म दराचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले. एक परिवार गावात असा होता, की त्यांना तीन-चार मुलीच होत्या. त्यांना मुलगा पाहिजे होता. वास्तविक मुलगा व मुलीत त्यांना काही फरक नाही. मुलीच आपल्या आई - वडीलांना अधिक जपतात. जीव लावतात. कर्तबगार मुलगी घराण्याचे नाव काढते. मुलगा दुराचारी बनला तर घराण्याचं नाव बदनाम करतो. अशा अनेक पध्दतींनी अण्णा हजारे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या परिवाराला समजावलं. वंशाला दिवा पाहिजे हा हट्ट ते परिवार सोडीनात. मग त्यांचा अपवाद वगळता सर्वांना परिवार नियोजनात ग्रामसभेने सामावून घेतले.

परिवार नियोजनाची जनजागृती गावकऱ्यांमध्ये केल्याने अनेकांनी दोन अपत्यानंतर परिवार नियोजन केले. एका मुलानंतर परिवार नियोजन केलेले अनेक युवक राळेगणसिध्दीत आहेत. एकाच मुलीनंतरही परिवार नियोजन केलेले काही राष्ट्रभक्त युवकही राळेगणसिध्दी येथे आहेत. जपान या देशात भूमीवरील खाणाऱ्या माणसांचा भार वाढू नये, यासाठी प्रत्येक युवक - युवती विवाह समारंभातच परिवार नियोजन करण्याची प्रतिज्ञा करतात. परिवार नियोजन हे राष्ट्रभक्तीचे प्रतीक समजले जाते. त्यामुळे पन्नास वर्षांपूर्वी असलेली जपानची लोकसंख्या आजही तेवढीच आहे. म्हणूनच महायुध्दात बेचिराख झ

ालेला जपान फिनिक्स पक्ष्यासारखा पुन्हा भरारी मारु लागला आहे. भारताला एकविसाव्या शतकातील महान शक्ती बनायचे असेल तर परिवार नियोजनाशिवाय पर्याय नाही असे अण्णा हजारे म्हणतात.

अठ्ठावीस वर्षांपूर्वी राळेगणसिध्दी परिवाराने परिवारनियोजनावर भर दिल्याने त्याचे चांगले परिणाम दिसून येतात. १९७५ मध्ये राळेगणसिध्दीची लोकसंख्या १८०५ होती. आता ती १९८२ झ ाली आहे. म्हणजे फक्त १७७ ने वाढ झाली आहे. हे परिवारनियोजनातले राळेगणसिध्दीचे मोठे यश मी समजतो, असे अण्णा हजारे म्हणतात. राळेगणसिध्दीत पूर्वी चौथी पर्यंत शाळा होती. दोन खोल्यांत वर्ग भरायचे. पुढे प्रत्येक वर्गाच्या ४०-४० मुलांच्या दोन तुकड्या झाल्या. त्यामुळे सहा वर्ग बांधावे लागले; परंतु आता पहिलीच्या एका तुकडीतील मुलांची संख्या अवघी सतरा आहे. ती एकच तुकडी आहे. जन्मदर घटल्यामुळे पहिलीतील मुलांची संख्या घटली. कमी मुलांमुळे त्यांच्याकडे जास्त लक्ष पुरविण्यात आले. शैक्षणिक दर्जा सुधारला. राहणीमानातही सुधारणा झाली आहे.

आता कुणा देशाचा ॲटमबॉम्ब आपला देश उद्ध्वस्त करणार नाही. लोकसंख्येचा स्फोटच आपणास गिळंकृत करेल. म्हणून आता परिवारनियोजन करण्याच्या सक्तीची गरज आहे, असे अण्णा हजारे म्हणतात.[१३]

**४.२५ धान्य बँक :**

राळेगणसिध्दी दुष्काळात होरपळत असताना अनेक परिवारांना उपासमारीला तोंड द्यावे लागत होते. जेमतेम २० टक्के लोकांना वर्षाला पुरेल एवढे धान्य शेतात होत असे. २० टक्के लोक अर्धपोटी राहून जगत होते. ६० टक्के लोकांना उपाशीपोटी राहावे लागत असे. हे लोक जगण्यासाठी

धडपडत होते. सावकाराकडून धान्य कर्जाऊ घेऊन जगण्याचा प्रयत्न करीत होते. १०० किलो धान्य आणले तर एका वर्षानंतर सावकाराला २०० किलो परत करावे लागे.

पाणलोट विकासाचे काम झाल्यावर शेती उत्पादनात सात ते आठ पटींनी वाढ झाली. १२५ एकर असलेली विहिरींवरील बागायती १५०० एकरांवर गेली. पूर्वी जिरायत जमिनीत एकरी फक्त २०० ते ३०० किलो धान्य होत असे. पाणलोट विकासानंतर त्यात १००० ते १६०० किलोपर्यंत वाढ झाली. ८५% लोकांचे शेतीउत्पन्न वाढले. शेतीत पुरेसे धान्य होऊ लागले; परंतु आज काही लोकांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी धान्य अपुरे पडते. ज्यांच्या जमिनी उंच भागात आहेत, जेथे पाणी पोचू शकत नाही, त्यांना वर्षभर धान्य पुरत नाही. वर्षातले तीन, चार महिने त्यांच्या घरात खायला धान्याचा दाणा नसतो. अशा लोकांच्या पोटाची काळजी ज्यांना भरपूर धान्य होते, त्यांनी घ्यायची असा निर्णय राळेगणसिध्दीच्या ग्रामसभेत झाला. पूर्वी आपणही अर्धपोटी होतो; परंतु परमेश्वराने पुरुन उरेल एवढे आपणास दिले आहे. ते उरलेले धान्य परमेश्वराचे आहे. त्यावर आपला हक्क नाही. ते उरलेले धान्य राळेगणसिध्दीचे शेतकरी २५ किलोपासून १०० किलोपर्यंत यादवबाबा मंदिराच्या धान्य बँकेत जमा करतात. त्याचा गरजेनुसार अर्धपोटी राहणाऱ्यांना पुरवठा केला जातो. फुकट मिळाल्याने त्याचे मुल्य कुणाला वाटत नाही. एकदा फुकट घेण्याची सवय जडली, की माणूस आळशी बनतो. त्याच्या श्रमशक्तीचा लोप होतो. म्हणून कुणालाही फुकट धान्य दिले जात नाही. १०० किलो धान्य बँकेतून नेले तर त्या व्यक्तीने शेतात धान्य आल्यावर पाच पायल्या वाढवून धान्याची परतफेड करावयाची असा नियम ग्रामसभेत करण्यात आला. त्याचे पालन सर्वजण करतात. जे जादा पन्नाससाठ क्विंटल धान्य जमा होते त्याचा उपयोग वसतिगृहातील गरीब विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी करण्यात येतो.

पाणी हा विकासाचा आत्मा जरुर आहे. ती निसर्गाने दिलेली देणगी आहे. त्या देणगीचा सर्वांच्या विकासासाठी उपयोग झाला पाहिजे. पाण्याव्दारे सर्वोदय झाला पाहिजे; परंतु एकेकाळी जिथे दुष्काळ होता त्या भागात कालव्याचे पाणी आले. तेथला दुष्काळ हटला. शेतीचे उत्पन्न सतत चढत्या क्रमाने वाढत गेले. घरात सुबत्ता आली. हतात पैसा खेळायला लागला, की माणूस दारुच्या पाण्याकडे वळायला लागतो. इतर व्यसने व इतर अनेक वाईट गोष्टी गावात वाढायला लागतात. राजकारण शिरते, गट-तट पडतात. गरिबांचे शोषण सुरु होते. माणुसकी हरविली जाते..। अशी अनेक उदाहरणे आहेत. गावात पाणी आल्याने खरा विकास झाला काय ? असा प्रश्न निर्माण होतो. असा विकास उपयोगाचा नाही. शाश्वत कल्याणाचा नाही, असे अण्णा हजारे म्हणतात.

गावात पाणी आल्यावर माणसांच्या अंगातही पाणी आले पाहिजे. धनिकांच्या डोळ्यात गरिबांच्याबद्दल पाणी आले पाहिजे; तरच खरा विकास होईल. केवळ चारचौघांचा विकास होऊन उपयोग नाही. गावातल्या सर्वांचा विकास झाला पाहिजे. तळातल्या माणसालाही पाण्यातून होणाऱ्या विकासाची फळे चाखायला मिळाली पाहिजेत. राळेगणसिध्दीत ते घडलं. धान्य बँक त्याचेच एक उदाहरण होय.[१४]

### ४.२६ सामूहिक विवाह :

लोकसंख्या वाढते तशी महागाई दिवसेंदिवस वाढत चालली आहे. तिचा अधिक फटका सामान्य माणसांना बसतो आहे. त्यांना दैनंदिन जीवन जगणे अशक्य झाले आहे. अशा बिकट अवस्थेत घरात उपवर मुलगी असेल तर तिच्या विवाहाची विवंचना सामान्यांना लागलेली असते. रात्रंदिवस तोच विचार पालकांच्या मनात असतो. या विवंचनेने त्यांची झोप उडते. हुंडा, मानपान, लग्नाचा खर्च करण्याची

अनेक पालकांची ऐपत नसते. त्यासाठी आपली जमीन गहाण टाकून कर्ज काढणे किंवा जमीन विकण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. हुंड्यासारख्या अनिष्ट रुढींमुळे मुलींचा विवाह जुळविणे गरिबांना अवघड जाते. ऐनवेळी अवास्तव हुंड्याच्या मागणीने मुलींचे ठरलेले विवाह मोडतात. अनेक मुलींचे जीवन बरबाद होते. तिचा परिवारही उद्‌ध्वस्त होतो.

दुसरीकडे श्रीमंत धनदांडगे आपल्या मुलींच्या लग्नात पाण्यासारखा अमाप पैसा खर्च करतात. आपल्या श्रीमंतीचे हिडीस प्रदर्शन करतात. श्रीमंतांचे असे विवाह समारंभ म्हणजे श्रीमंतीने गरिबीची उडविलेली एक प्रकारची टिंगलच होय. गरीब माणूस मुलीचे लग्न कसे करायचे या चिंतेने डोक्याला हात लावून बसला आहे तर धनदांडगे गरिबांची शंभर लग्ने होतील असा खर्च आपल्या मुलीच्या लग्नात करतात. या सामाजिक आणि आर्थिक विषमतेला छेद देण्यासाठी आणि गरिबांना आधार देण्यासाठी सामुदायिक विवाह हा चांगला पर्याय आहे. त्यासाठी आपल्या संपत्तीतला काही भाग सामुदायिक विवाहासाठी धनिकांनी खर्च केला तर काही तरी समाजसेवा केल्याचे समाधान धनिकांना मिळेल. गरिबांनाही दिलासा मिळेल. धनिकांनी आपल्या मुलीच्या विवाह समारंभातच काही गरीब मुलींचेही विवाह एकाच मांडवात लावले तर विषमता दूर व्हायला मदत होईलच. शिवाय गरीब व धनिकात एकतेची व सहानुभूतीची भावना निर्माण होईल. समाजात विधायक दृष्टिकोन निर्माण होईल.

ग्रामीण भागात बांधावरुन, शेतवाटणीवरुन, भावाभावांत वाद असतात. पिढ्यानुपिढ्या भाऊबंदकीचे वाद चालतात. इतर अनेक कारणांनीही परिवारात वितंडवाद असतात. हे हेवेदावे लग्न समारंभात मानपानावरुन उकरुन काढले जातात. त्यामुळे मंगल कार्यात अमंगल घडते; परंतु सामूहिक विवाह समारंभात असे घडू शकत नाही. कारण सामूहिक विवाह समारंभात विविध ठिकाणचे प्रतिष्ठित

लोक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. त्यामुळे वाद उकरुन काढल्यावर सामाजिक दबाव निर्माण होतो. वाद उकरुन काढले तर जमवलेले लोक आपणास काय म्हणतील याची भीती मनात वाटत असते. म्हणून भांडणकरुन लग्नात कूणी विघ्न निर्माण करीत नाही. सामूहिक विवाहामुळे बालविवाह व हुंड्यासारख्या अनिष्ट व समाजघातक प्रथांनाही पायबंद बसतो.

१९७८-७९ पासून राळेगणसिध्दीत सामूहिक विवाह समारंभाची प्रथा सुरु झाली. वर्षात नियोजित वधूंवरांचे विवाहासाठी तीन गट तयार करण्यात येऊन सामुदायिक विवाह पार पाडले जातात. जास्त लग्ने ठरली असतील तर एकाच मांडवात १५ ते २० विवाह समारंभ साजरे होतात. सधन, मध्यमवर्गीय, गरीब सर्व परिवारातील मुलामुलींचे विवाह याच मांडवात लावले जातात. गरीब माणसांकडून काहीही न घेता त्यांच्या मुलींचे विवाह ग्रामस्थांनी पार पाडले आहेत. जात, पात न पाहता आणि स्पृश्य-अस्पृश्य असा भेदाभेद न करता सर्व जातिधर्माचे विवाह एकाच मांडवात होतात. सर्वजण एका पंक्तीत जेवायला बसतात. वाढपींत सर्व जाती धर्मांचे लोक असतात. आंतरजातीय विवाहदेखील गावात झाले आहेत. त्यामुळे राळेगणसिध्दीत कुठेही भेद नाही. 'एक गाव एक परिवार' ही भावना राळेगणसिध्दीत स्थायी स्वरुपात निर्माण झाली आहे. त्यामुळे राळेगणसिध्दी राष्ट्रीय एकतेचे प्रतीक बनले आहे.

सामूहिक विवाह ही आता काळाची गरज आहे. खोट्या प्रतिष्ठेपायी डोळे दिपविणाऱ्या झ ागमगाटात लग्न पार पाडणे हा सामाजिक द्रोह आहे असे अण्णा हजारे समजतात. विवाह समारंभात विजेच्या दिव्याची रोषणाई, प्रदूषन पसरविण्याऱ्या शोभेच्या दारुची आतषबाजी, ध्वनिप्रदूषण माजविणाऱ्या बँड, वाजंत्रीचे भव्य पथक आणि अन्नाची नासाडी करणाऱ्या विविध पदार्थांची रेलचेल

असलेले भोजन हा आता शहरे आणि नगरातील विवाहाचा भागच बनला आहे. भव्यदिव्य असे विवाह पार पडले तर आपली प्रतिष्ठा समाजात वाटून लोक वाहवा करतात हा गैरसमज आहे. विवाह समारंभ पार पडल्यावर चारपाच दिवसांत समारंभाची भव्यता लोक विसरुन जातात. काही पुरोगामी वृत्तीचे लोक अशा वैभवशाली विवाहसमारंभावर टीकाही करतात; मात्र एखाद्या धनिकाने आपल्या मुलीच्या लग्नात इतर गरिबांच्या मुलामुलींचे विवाह समारंभ लावले तर त्याच्या स्मृती समाजाच्या मनात अनेक वर्षे रेंगाळत असतात. त्याची प्रशंसा होते. इतरांना त्यापासून प्रेरणा मिळते. अशा माणसांचा समाज सन्मान करतो. म्हणून धनिकांनी सामूहिक विवाह समारंभ करावेत, असे अण्णा हजारे म्हणतात.

अलीकडे काही वर्षांपासून बाहेरुन लग्नासाठी येणाऱ्या मुलामुलींची लग्ने राळेगणसिध्दी येथे पार पाडली जातात.[१५]

## ४.२७ अंधश्रध्दा निमूर्लन :

जगात शेंदूर फासलेले दगडाचे देव आणि सर्वाधिक अंधश्रध्दा आपल्या देशातच आहेत देवांच्या संख्येबाबत भारताची ‘गिनीज बुक ऑफ रेकॉर्डस’मध्ये नोंद व्हावी, एवढे देव आपल्या देशात आहेत. प्रत्येक जातीजमातीचे देवही वेगवेगळे आहेत. कुणी मरीआई, जोखाई, जाणाई पुजतो. कुणी म्हसोबा, म्हातोबा, येताळबाची पूजा करतो. दगडाला शेंदूर फासला, की तयार झाला नवीन देव..। असे कितीतरी शेंदराचे देव भारतात स्वार्थी माणसांनी जन्मास घातलेले आहेत. श्रम न करता पोट भरणाऱ्यांनी देवदेवतांचा धंदा बनविला आहे. आपले खिसे भरण्यासाठी या देवदेवतांच्या भगतांनी समाजात अनेक अंधश्रध्दा पसरविल्या आहेत. त्या अंधश्रध्देला लोक बळी पडतात. नवस बोलतात. कोंबडे, बकरे कापतात. अघोरी उपायासाठी खर्च करतात आणि नागविले जातात.

राळेगणसिध्दीत दखील अनेक अंधश्रध्दा होत्या. त्यामुळे समाजजीवन गढूळ झाले होते. या अंधश्रध्दा गावच्या विकासाला अडथळा ठरल्या होत्या. गावातील अंधश्रध्दा दूर करण्याची प्रतिज्ञा अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतली. गावात अंधश्रध्दा जोपासणारे अनेक महाभाग होते. त्यांच्याशी अण्णा हजारे यांना सामना करावा लागला. गावाच्या शिवेवरती पद्मावती देवीचे मंदिर आहे. देवी गावचे ग्रामदैवत आहे. गावात दर चैत्र शुध्द सप्तमीला देवीची यात्रा भरते. पदमावतीला लोक पार्वतीचा अवतार मानतात. तिला पुरणपोळीचा नैवेद्य करणे योग्य आहे; परंतु यात्रेच्या निमित्ताने लोक बकरे कापायचे. योत्रेनिमित्त घरी आलेल्या पाहुण्यांसह कापलेल्या बकऱ्याची मेजवानी झोडायचे. देवीच्या नावाखाली स्वतःच्या जिभेचे चोचले पुरवायचे. गावात दारुबंदी असल्याने गावात कुणी दारु पीत नसे; पैपाहुणे आपल्या गावाहूनच पुरेसा साठा आणायचे. मांसाहार आला, की मद्य आलेच. पैपाहूणे चोरुन दारु प्यायचे. त्यामुळे गावचे वातावरण पुन्हा गढूळ होण्याची शक्यता होती. १९८० मध्ये गावच्या विकासकामातून गावकऱ्यांची मानसिकता बदलत चालली होती. चांगल्या आचार - विचारांची माणसे एकत्र आली होती. अण्णा हजारे यांनी ग्रामसभा घेतली. जो देव जीवन देतो तो देव कुणाचा बळी मागणार नाही. परमेश्वराचं अस्तित्व मानवासह सर्व जीवांत आहे. त्या कोंबड्या, बकऱ्यांतही परमेश्वराचे अस्तित्व आहे. त्या कोंबड्या, बकऱ्यांस कापणे म्हणजे देवास कापणे होय. माणसाला जखम होऊन रक्त आले तर वेदनेने जीव तळमळतो. मग बकऱ्याच्या मानेवर सुरी फिरवताना त्याला किती वेदना होत असतील! याचा आपण विचार करावा, असे अण्णा हजारे म्हणतात. दुसऱ्याचा जीव घेऊन त्यावर आपले पोट भरणारा आपल्या जीवनात कधी सुखी होत नाही. बकरे गरीब असते व प्रतिकार करत नाही. त्याचे मांस खायला चवदार आहे म्हणून तुम्ही बकरे कापता. वाघ, सिंह, कुत्रे, मांजर का कापत नाहीत ?

हे विचार अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रामसभेसमोर मांडले. लोकांना ते पटले, तेव्हापासून पशुबळी देण्याची प्रथा बंद करण्याचा निर्णय ग्रामसभेत झाला.

पशुबळीला विरोध करणारे मुद्दाम ग्रामसभेला आले नव्हते. त्यांच्या मनातल्या अंधश्रध्दा खूप प्रबळ होत्या. ग्रामसभेत झालेल्या ठरावाने त्यांच्या भावना दुखावल्या होत्या. त्यामुळे ते पेटून उठले होते. त्यामुळे देवीचा कोप गावाला भोगावा लागणार, असा अपप्रचार त्यांनी सूरु केला होता. सामान्य माणसांची मने खूप कमकुवत असतात. अंधश्रध्देला ती बळी पडतात. गावात असणारे देवीचे भक्त व स्वार्थलोलुप धर्ममार्तंड म्हणविणारे आगीत तेल ओतण्याचे काम करत होते. त्यामुळे ग्रामसभेत ठराव होऊनही पिढ्यान् पिढ्या समाजात रुजलेली पशुबळीची पध्दत बंद कशी होणार ? असा प्रश्न अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांसमोर निर्माण झाला होता.

पद्मावती देवीच्या यात्रेचा दिवस उगवला. त्या वेळी अण्णा हजारे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मंदिरासमोर मोठें होमकुंड तयार केले. एक गाडी भरुन लाकडे आणली ती लाकडे टाकून अण्णा हजारे यांनी होमकुंड पेटवलं. ज्यांना देवीला बकरे कापायचे त्यांनी जरु कापावं; परंतु कापलेलं सर्व बकरे होमात टाकून देवीला अर्पण करावे. बकऱ्याचा कुठलाही अवशेष घरी घेऊन जाऊ नये. देवीच्या नावाने कापता, देवीला अर्पण करा. या सूचना अण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांनी बकरे कापणाऱ्यांना कळविल्या. बंदोबस्तासाठी सर्व तरुण मंडळी होमकुंडाजवळ हजर होती. ही सूचना कळाल्यावर खायला मिळणार नसेल तर कापायचे कशाला ? असा विचार करुन दिवसभरात कुणीही देवाला बकरे कापले नाही. कापण्यासाठी आणलेले बकरे परत घेऊन गेले. या प्रकाराने देवीचा एक भगत चिडला. देवी अंगात संचारल्यासारखा तो थयथयाट करीत घुमायला लागला. वेडेवाकडे अंगविक्षेप व हातवारे करीत, ‘ज्यांनी

माझा रस्ता बंद केला, त्यांना दोन महिन्यांत मी इंगा दाखवीन. त्यांच्या घरादाराची राखरांगोळी करीन; असे तारस्वरात बडबडायला लागला. देवीच त्याच्या मुखातून बोलतेय असे समजून अंधश्रध्दाळू गावकरी घाबरले. देवी कोपली तर गावचे काही खरे नाही. अशी चर्चा लोकांत सुरु झाली. असे काही होणार नसल्याचे अण्णा हजारे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी गावकऱ्यांना समजावून सांगितले. देवी देईल ती सजा भोगण्यास आम्ही तयार आहोत, तुम्ही विनाकारण घाबरु नका असेही अण्णा हजारे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी लोकांना सांगितले; पण भगताच्या शापवाणीने घाबरलेले लोक ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते.

भगत अधिक बडबडायला लागला. नको ते बोलून लोकांना अधिक घाबरवू लागला. तसे सर्व कार्यकर्त्यांचे डोके भडकले. दोघा कार्यकर्त्यांनी निरगुडीचे जाड फोक तोडले आणि देवी संचारलेल्या भगताचा समाचार घ्यायला सुरुवात झाली. फोकाचे दोन दमदार फटके बसताच भगताच्या अंगात संचारलेली देवी गायब झाली. तो हातपाय पडत गयावया करु लागला. देवी वगैरे माझ्या अंगात आली नव्हती, मी मनानेच बोलत होतो, असे त्याने कबूल केले. बकरे न कापल्याने देवी कोपणार नसल्याचेही त्याने कबूल केले.

भगताचा ढोंगीपणा गावकऱ्यांना कळला. अण्णा हजारे यांचे विचार सर्वांनी मान्य केले. तेव्हापासून पशुबळीची प्रथा बंद झाली. त्याला आता चोवीस वर्षे झाली; परंतु पद्मावती देवी कुणाच्या घरावर, गावावर कोपली नाही. कुणावर तिची अवकृपा झाली नाही. कुणाचेही तिने वाईट केले नाही. उलट गावकरी सुखी झाले, सर्वांचे कल्याण झाले.

पशुबळीशिवाय राळेगणसिध्दीत अनेक अंधश्रध्दा होत्या. ज्या स्थळामुळे या अंधश्रध्दा निर्माण झाल्या होत्या ती स्थळेच अण्णा हजारे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांनी उखडून टाकली. गावात प्रवेश करताना रस्त्यावर पाच - सहा फूट उंचीचा मोठा शिलाखंड होता. कुणातरी उपद्व्यापी माणसाने त्याला शेंदूर फासला, त्यामुळे त्याला लोक 'वेताळबाबा' म्हणू लागले. तो चैतन्यहीन दगडाचा वेताळबाबा गावाची रखवाली करतो, चोरचिलटाला, भुताखेताला व रोगराईला गावात प्रवेश करु देत नाही असे लोक सांगायचे. त्याच्या चमत्काराविषयी अनेक भाकडकथा प्रचलित होत्या. सणावाराला लोक त्याला नैवेद्य दाखवयचे, नारळ फोडायचे, रस्त्यातच असल्याने त्या वेताळबाबाच्या दगडाचा वाहतूकीला मोठा अडथळा निर्माण झाला होता. एकदिवस हा उपद्रवी वेताळबाबा रस्त्यातून बाजूला काढण्याचे अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ठरवले. रात्री दहा - बारा कार्यकर्ते टिकाव, खोऱ्यासह जमले. त्या पाषाणखंडाला रस्त्यातून काढून बाजूला ठेवले; पण आम्हा कुणावर तो कोपला नाही कुणालाही काही झाले नाही असे अण्णा हजारे सांगतात.

यादवबाबा मंदिराच्या रस्त्यावरच पाच फूट लांब व पाच फुट उंचीचा दगडाचा चौथरा होता. तो कुणाचा चौथरा आहे? कुणी व केंव्हा बांधला? याची कुणा गावकऱ्यास काही माहिती नव्हती; मात्र कुणा साधूची समाधी समजून सणासुदीला लोक त्याची पूजा करायचे, त्याला नैवेद्य वाहायचे, महिला हळदीकुंकू वाहायच्या; पण ती समाधी कुणाची आहे? हे कुणालाही ज्ञात नव्हते. तो चौथरा रस्त्याच्या मध्यभागी असल्याने वाहतुकीला अडथळा ठरत होता. तो चौथराही अण्णांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी उखडून टाकून रस्ता मोकळा केला.

गावच्या पूर्वेला पाझरतलाव बांधण्याचे काम ठरले. साईट इंजिनिअरने त्याची आखणी करुन काम सुरु केले. पाया खोदताना त्याला एक शेंदराचा दगड सापडला. त्याला म्हसोबा समजून मजूरांनी काम बंद केले. पाझरतलावाची जागा बदला, नाहीतर म्हसोबा तडाखा देईल, तलाव होऊ देणार नाही, असे अंधश्रध्देने प्रभावित लोक म्हणायला लागले. तो दगड बाजूला काढला तर म्हसोबाचा कोप होईल याची मजुरांना भीती वाटत होती. त्यामुळेच त्या दगडाला हात लावायला कुणीही तयार होईना. शेवटी गावातील युवकांनी त्या म्हसोबाला हलवून बाहेर काढून टाकले आणि पाझर तलावाचा पाया खोदला. उत्तम पाझरतलाव तयार झाला. त्यात भरपूर पावसाचे पाणी साठले. विहिरींचे पाणी वाढले. जमिनी ओलिताखाली आल्या. अशा रीतीने राळेगणसिध्दीतील अंधश्रध्दांना मूठमाती देण्यात आली.

माणसांच्या जन्मापासूनच भारतात अंधश्रध्दा जन्माला येतात. पाचवीला आईसह तान्ह्या बाळाला वेशीबाहेर नेतात. लहान लहान सात दगड मांडून सटवाईची पूजा केली जाते. प्रथम बाळाची आई पुजण्यासाठी गावाबाहेर जात असताना पायामध्ये चप्पल असते. बाळंतीण मुलींना सांगत असते गोदे हा एक देव घे, पायातील चपलेची ठोकर मारुन दुसऱ्या मुलीला सांगत असते, गंगे हा एक देव घे, चपलांची ठोकर मारुन सात दगड एका ओळीत मांडते. त्यावर तांब्यातले पाणी ओतते. हळदकुंकू वाहते. नारळ फोडते. उदबत्ती लावते. त्याला पक्वान्नाचा नैवेद्य दाखविते. बाळाला त्या दगडासमोर ठेवून ‘सटवाई माते, बाळाचा सांभाळ कर व रक्षण कर’ अशी हात जोडून प्रार्थना करते. मोठे देवकार्य केल्याचे समाधान मानून सर्वजण घरी परत येताच, त्या दगडांना वाहिलेला नैवेद्य कुत्री पळवतात. पहाटे पाण्याशिवाय शौचाला जाणारा खेड्यातला माणूस त्याच दगडाचा प्रातर्विधी उरकण्यासाठी उपयोग करतो. अशी या दगडांची अवस्था! ते बाळाचे काय सरंक्षण करणार ? अंधश्रध्देतून सगळे दगडाचे देव

निर्माण झाले आहेत. त्यांना काही भावभावना नसतात. ते पाहू शकत नाहीत. उठू शकत नाहीत. नैवेद्य पळविणाऱ्या कुत्र्यामांजरांना तो हाकलू शकत नाहीत.

जी विश्वचालक शक्ती आहे तो एकच ईश्वर आहे. त्याला हिंदू धर्मातं भगवान म्हणतात तर मुस्लिम धर्मात 'अल्ला' म्हणतात.

प्रत्येक प्राणिमात्रात ईश्वर आहे. त्याचा आत्मा ईश्वर स्वरुप आहे. म्हणून दीनदुबळ्यांची सेवा हीच ईश्वरसेवा असल्याचे आपल्या सर्व संतांनी सांगितले आहे; परंतु माणूस आपल्या आतला देव जाणण्याऐवजी, बाहेर देव शोधतो. अंधश्रध्देतून त्याने अनेक दगडांना शेंदूर फासून देव बनविले. जीवन देणारा खरा देव जीवाचे बलिदान मागत नाही.

जग आज विज्ञानामुळे जवळ आले आहे. माहिती व तंत्रज्ञानातून जग नवलपूर्ण प्रगतीकडे घोडदौड करीत आहे. अशा या विज्ञानयुगात शेंदूर फासलेल्या दगडांना-देवांना कवटाळून व त्यांना कोंबडे, बकरे कापून प्रगती न होता अधोगती होईल. अशा विनाशकारी अंधश्रध्दा गाडून टाकण्यासाठी कार्यकर्त्यांनी लोकशिक्षण व लोकजागृतीचे काम करावे. गावच्या विकासात अडथळा ठरणाऱ्या सर्व अंधश्रध्दांचे निर्मुलन करावे असे अण्णा हजारे म्हणतात.[१६]

## ४.२८ ग्रामपरिवर्तन दिन :

पंडित आणि ज्ञानी यांत खूप फरक आहे. ग्रंथवाचनातून पांडित्य येते तर अनुभवातून ज्ञान प्रकट होते. एखाद्या कार्यकर्त्याने आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून, त्या दिशेने प्रत्यक्ष कृतिकार्य सुरु केले, तर ते काम त्याचा गुरु बनते. त्यातून त्याचा अनुभव संचित होऊन त्याला सत्यज्ञान प्राप्त होते. श्री संत

गाडगेबाबा, श्री संत तुकडोजी महाराज कुठल्याही शाळा, कॉलेजात गेले नव्हते; परंतु त्यांच्याजवळ अनुभवसिध्द ज्ञानाचे भांडार होते. त्याव्दारे त्यांनी समाजाचे अज्ञान दूर करुन आदर्श समाज निर्माण करण्याचा जीवनभर प्रयत्न केला. दीनदलितांची सेवा हीच त्यांनी ईश्वरसेवा मानली. त्याच ध्येयाने राळेगणसिध्दीकरांची वाटचाल सुरु झाली. मानवसेवेतून ईश्वरसेवाकार्य करीत असताना कामच कामाचा गूरु बनला. त्यातून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व दिशा मिळाली. त्याप्रमाणे काम उभे राहून दुष्काळग्रस्त राळेगणसिध्दीचा झालेला कायाकल्प पाहून तो नियोजन बध्द पध्दतीने झालेला असावा असे त्यांना वाटते; परंतु नियोजन करुन राळेगणसिध्दीचा विकास झालेला नाही तर अण्णा हजारे व गावकरी अनुभवातून शिकत गेले. अनुभवातूनच राळेगणसिध्दी विकसित झाली. अशा अनुभवातून कार्यकर्त्यांना एक नावीन्यपूर्ण कल्पना सुचली. ती म्हणजे ग्रामपरिवर्तन दिन. गावात अनुभवातून जे परिवर्तन झाले, त्याचा स्मरणदिन अथवा वर्धापनदिन साजरा करण्याचे अण्णांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ठरविले. त्याला राळेगणसिध्दीकर ग्रामपरिवर्तनाचा वाढदिवस म्हणतात. ज्यांनी आदर्श स्वावलंबी गावाचे स्वप्न बाळगून त्या दिशेने ग्रामोध्दाराचे काम केले, त्या महात्मा गांधींच्या २ ऑक्टोबर या जयंतीदिनी गावकरी हा परिवर्तन दिन साजरा करतात.

१. वर्षभरात ज्या युवकांचे लग्न झाले, विवाह झाले त्यांच्या पत्नीच्या रुपाने गृहलक्ष्मीच गावात आली. त्या सर्व नववधू राळेगणसिध्दी परिवाराच्या सुना आहेत असे मानून त्या नववधूंचे साडी चोळी देऊन व खणानारळांनी ओटी भरुन स्वागत केले जाते. त्यांचा अवघाची संसार सुखाचा होण्यासाठी त्यांना शुभाशीर्वाद दिले जातात.

२. आजची बालके ही उद्याच्या भारताचे आधारस्तंभ आहेत. गावचे तारणहार आहेत. या भावनेतून वर्षात ज्या बालक - बालिका गावात जन्मल्या; मग त्या कोणत्याही जाती जमातींच्या अथवा धर्मवंशाच्या असोत, त्या सर्व बालक - बालिकांना नवीन कपडे देऊन अण्णा हजारे व त्यांचे सहकारी त्यांच्या जन्माचे स्वागत करतात. हे सर्व बालक - बालिका राळेगणसिध्दी परिवारातील आहेत या भावनेने त्यांना शुभाशीर्वाद देण्यात येतात.

३. अनेक उन्हाळे आणि पावसाळे पाहिलेले वयोवृध्द पुरुष आणि महिला हे गावचे वैभव आहेत. त्यांचा आदरसन्मान राळेगणसिध्दी येथे राखला जातो. ग्रामपरिवर्तनदिनी अण्णा त्यांचा गौरव करतात. वयोवृध्दांपैकी ज्यांचे सर्वाधिक वय आहे अशा एक महिला व एका पुरुषाला ग्राममाता - ग्रामपिता मानून, त्यांचे सर्व गावकरी पूजन करतात. त्यांना वस्त्रदान करतात.

४. जपानमध्ये परिवार नियोजन हे देशभक्तीचे प्रतीक मानले जाते. वाढत्या लोकसंख्येने आज अधिक लोकसंख्या वाढलेल्या देशात विविध समस्या निर्माण होत आहेत. वाढत्या लोकसंख्येला अन्न, पाणी, निवास पुरवायला धरती असमर्थ ठरणार आहे. बेरोजगार युवकांची संख्या वाढत आहे. त्यांच्या मूलभूत गरजाही भागत नाहीत. लोक वाममार्गाकडे वळले आहेत. लोकसंख्येचा स्फोट सर्वांना भस्म करील. यासाठी परिवार नियोजन ही काळाची गरज आहे. जपानमध्ये युवक - युवती परिवार नियोजन करतात. काही युवक तर अपत्य होऊच देत नाहीत. त्यामुळे चाळीस वर्षांपूर्वी जपानची लोकसंख्या जेवढी होती तेवढीच आजही आहे. म्हणून जपान जगात सर्वच क्षेत्रांत समर्थ राष्ट्र म्हणून आज आघाडीवर आहे. आपल्या गावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी गावाची लोकसंख्या मर्यादित राखण्याची गरज आहे. म्हणून

राळेगणसिध्दीत ज्या नवविवाहित वधूवरांची शस्त्रक्रिया करुन एकाच अपत्यावर परिवार नियोजन केले अशा राष्ट्रभक्त जोडप्यांचा सत्कारही ग्रामपरिवर्तन दिन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात केला जातो.

५. प्राथमिक व शाळेतील जे विद्यार्थी विविध परीक्षांत सर्वाधिक गुण संपादन करुन उत्तीर्ण होतात, जे विद्यार्थी क्रीडा, राष्ट्रीय शिष्यवृत्ती इत्यादी विशेष क्षेत्रात नैपुण्य संपादन करतात अशा विद्यार्थ्यांचा व विविध क्षेत्रांत पराक्रम गाजविणाऱ्या युवकांचा गौरव ग्रामपरिवर्तन दिनाच्या उत्सवात गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येतो.

६. राळेगणसिध्दीच्या विकासकामात ज्या बाहेरच्या लोकांचे बहुमोल सहकार्य लाभले अशा समाजसेवक, कार्यकर्ते, निःस्पृह शासकीय कर्मचारी यांचाही सन्मान ग्रामपरिवर्तन दिनी केला जातो.

अशा प्रकारे ग्रामपरिवर्तन दिन हा आता राळेगणसिध्दी येथील लोकप्रिय उत्सव बनला आहे. या दिवशी सर्व कार्यक्रम संपल्यानंतर गरीब - श्रीमंत, स्पृश्य - अस्पृश्य मांडीला मांडी लावून एकत्रितरीत्या भोजन करतात. या वेळी पहिल्या भोजनाच्या पंक्तीत महिलांना पहिला मान असतो. सतरा - अठरा वर्षांपासून ग्रामपरिवर्तन दिन राळेगणसिध्दीत उत्साहाने साजरा केला जातो. होणाऱ्या खर्चासाठी गावकरी स्वेच्छेने वर्गणी देतात. अशा कार्यक्रमामुळे एक गाव- एक परिवार हा विचार गावात रुजायला मदत होते. राळेगणसिध्दीची प्रेरणा घेऊन अनेक गावे आज ग्रामपरिवर्तन दिन साजरा करत आहेत.[१७]

## ४.२९ राळेगणसिध्दी : कालचे आणि आजचे :

राळेगणसिध्दीची १९७५ मध्ये जनसंख्या १७०५. एकूण भौगोलिक क्षेत्र २२०० एकर. १७०० एकर लागवडीखाली. ५०० एकर पडीक जमीन. (DPAP) अवर्षणग्रस्त गाव. वर्षातून पाऊस जेमतेम ४०० ते ५०० मि.लि., १२५ ते १५० एकर जमिनीला खरीप पिकासाठी जेमतेम पाणी मिळत असे. रब्बी पिके एक-दोन पाण्याअभावी जळून जात. पडणाऱ्या पावसाचे पाणी अडविलेले नसल्याने सर्व वाहून जात होते. त्यामुळे एप्रिल - मेमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असे. वेळेला पाण्याचे टँकर बोलावण्याची वेळ येत असे. ६० ते ६५% लोक बाहेरचे धान्य आणीत असत. १५% लोक अर्धपोटी होते. जेमतेम २०% लोकांकडे वर्षभर पुरेल एवढे धान्य उत्पादित होत असे. गावात हाताला काम नाही म्हणून कामासाठी लोक गावाबाहेर जात असत. काही लोकांनी उपजिविका चालविण्यासाठी दारुच्या हातभट्ट्या सुरु केल्या. दारु गाळून परिसरातील गावांना विक्री करुन उपजीविका चालवत असत. गावात शैक्षणिक सुविधा नव्हती. दोन खोल्यांमध्ये चौथी पर्यंतचे वर्ग भरत असत. गावाच्या इतिहासात एस.एस.सी. उत्तीर्ण झालेली पहिली मुलगी १९८२ मध्ये झाली. यावरुन शैक्षणिक व्यवस्था कशी होती हे लक्षात येते. गावातून १०० ते १२५ लिटर दूध गावाबाहेर जात नव्हते.

### राळेगणसिध्दी आज :

राळेगणसिध्दीची जमीन तीच आहे. माणसे तीच आहेत, गावही तेच आहे, उद्योगपती, फंडिंग एजन्सीकडून देणग्या घेतलेल्या नाहीत. सुरुवातीपासूनच राळेगणसिध्दी परिवाराने ठरविले आहे, की देणग्या घ्यायच्या नाहीत. 'दान माणसांना नादान करते,' अशी ग्रामस्थांची धारणा आहे.

राळेगणसिध्दीमध्ये देणग्या न घेता सरकारी योजना, लोकांचा सहभाग आणि बँकेचे कर्ज यांची सांगड घातल्याने आज लोक स्वावलंबी झाले आहेत.

फक्त पावसाचे पडणारे पाणी अडविले, भूगर्भात जिरविले आणि पाण्याची पातळी वाढविण्याचा प्रयत्न केला. पूर्वी १५० एकर जमिनीला पाणी मिळत नव्हते. आज १५०० एकर जमीनीत खरीप आणि रब्बी हंगामातील पिकांना पाणी मिळू लागले आहे. पूर्वीपेक्षा सहा ते आठ पटींनी उत्पादन वाढले आहे. पूर्वी ८५% लोकांना पुरेसे धान्य होत नव्हते. आज ८५% लोकांचे उत्पादन वाढले असून त्यांना बाहेरचे धान्य घेण्याची गरज राहिलेली नाही.

दरवर्षी २०० ते २५० ट्रक कांदा विक्रीसाठी बाहेर जातो. पूर्वी १२५ ते १५० लिटर दूध बाहेर जात नव्हते. आज दररोज चार हजार लिटर दूध बाहेर चालले आहे. दूध व्यवसायामधे सर्व तरुण मुले आहेत. नोकरीपेक्षा अधिक पैसा त्यांना गावातच मिळू लागला आहे.

पूर्वी गावात दरडोई उत्पन्न २०० ते २२५ रुपये होते. ते आज २००० रुपयांवर गेले आहे. चौथी पर्यंत शाळा होती. आज बारावीपर्यंत शाळा आहे. मुलींचे शिक्षण चांगले झाल्याने काही मुली शिक्षिका झ ााल्या आहेत.

गावाची पतसंस्था काढली असून ४ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झालेल्या आहेत. महिलांचे सतरा बचतगट असून महिला बचतगटांमध्ये १२ ते १३ लाख रुपये जमा झाले आहेत. गावाची आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे शाळेची २५ लक्ष रुपयांची इमारत ग्रामस्थांनी श्रमदानातून आणि गावाच्या लोकांनीच देणग्या देऊन पूर्ण केली आहे.

वसतिगृहाच्या इमारतीमध्ये सहा महिने ग्रामस्थांनी श्रमदान करुन सरकारच्या फक्त ५ लक्ष रुपयांत २० लक्ष रुपयांची इमारत उभी केली आहे. २००१ या वर्षी वसतिगृहाच्या भोजनगृह आणि निवासासाठी नवीन इमारत २८ लक्ष रुपये किमतीची बांधली आहे. सरकार किंवा इतर कोणाकडून एक रुपयाही देणगी घेतलेली नाही.

ग्रामस्थांनी संत यादवबाबाचे भव्य मंदिर आपल्याच हिमतीने उभे केले आहे. गावकरी एकत्र आले तर त्यांच्यामध्ये किती मोठी शक्ती आहे हे येथे स्पष्ट दिसते.

आज खेड्यांमध्ये ग्रामस्थ एकत्र येत नाहीत हेच दुर्दैव आहे. लोक एकत्र येत नाहीत असे म्हणण्यापेक्षा त्यांना बाहेरचे काही लोक एकत्र येऊ देत नाहीत. कारण लोक एकत्र आले तर मला कोण विचारणार? हा धोका बऱ्याच लोकांना वाटतो. म्हणून गावात पक्ष-पार्टी, जातीयवाद, खालची आळी, वरची आळी..। कोणत्या कोणत्या तरी निमित्ताने गटबाजी निर्माण झाली आहे. याच नीतीचा वापर करुन इंग्रजांनी या देशावर १५० वर्षे राज्य केले. आज इंग्रज या देशातून गेला असला तरी त्यांची नीती तशीच राहिली. कार्यकर्त्यांनी गावाची सेवा हीच देशाची सेवा समजून कार्य करायला हवे. कुणाला सरपंच व्हायचे, चेअरमन व्हायचे त्यांना होऊ द्या, आपण फक्त सेवा करीत राहावे, असे अण्णा हजारे म्हणतात.[१८]

### ४.३० सारांश :

बलशाली भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी गांधींनी ‘खेड्याकडे चला’ असा संदेश दिला होता. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही हे वास्तव त्यांनी ओळखले होते.

शेतीप्रधान असणाऱ्या भारत देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख ग्रामीण विकासावर आधारलेला आहे. त्यादृष्टीने गांधींचे विचार लाखमोलाचे आहेत.

शासकीय योजनांच्या माध्यमातून विकासकामे सुरु असतातच; पण त्याला अपेक्षित यश मिळतेच असे नाही. प्रत्येक योजना अधिकाधिक यशस्वी करण्यासाठी त्या योजनेत लोकसहभाग महत्त्वाचा असतो. पस्तीस वर्षापूर्वी अण्णा हजारे यांच्या नेत्वृत्वाखाली राळेगणसिध्दीने ही गरज ओळखली. खऱ्या अर्थाने गावचा विकास साधायचा असेल तर सर्वांना एकत्र येऊन, संघशक्तीच्या माध्यमातून काम करावे लागेल, हे जाणून ग्रामस्थांनी तसा दृढ निश्चय केला. सर्वजण कामाला लागले. निव्वळ सरकारी मदतीवर अवलंबून न राहता एकामागोमाग एक अशा विविध योजना राबविल्या.

शासकीय योजना अधिकाधिक यशस्वी करण्यासाठी लोकसहभागाची मोठी गरज असते. ३५ वर्षापूर्वी समाजसेवक अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली राळेगणसिध्दीने ती ओळखली. गावच्या संघशक्तीचा वापर करुन, विकासाची पंचसूत्री अंगीकारुन गावविकासाचे एकेक आश्चर्य घडविले आणि त्यात एकेका विकासकामाची व सामाजिक कामाची अद्यापही भर पडत आहे. खऱ्या अर्थाने आदर्शगाव घडवायचे असेल तर गावातील माणूस बदलला पाहिजे. अनिष्ट गोष्टी तात्काळ व कायमच्या थांबविल्या पाहिजेत. असा विचार सुरु करुन ग्रामस्थांनी ग्रामविकासाची एक पंचसूत्री तयार केली, ती अशी -

१. नसबंदी,

२. नशाबंदी,

३. कुऱ्हाडबंदी,

४. चराईबंदी,

५.    श्रमदान.

या पंचसूत्रीचा उद्देश विकासाला अडसर ठरणाऱ्या वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे, कौटूंबिक प्रगतीला खीळ घालून सामाजिक शांतता विस्कळीत करण्याबरोबरच तरुण पिढीला अनिष्ट मार्गाला लावणाऱ्या सर्व प्रकारच्या व्यसनांची सामूहिक होळी करणे, प्रचंड वृक्षतोडीमुळे होत असलेला पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्यामुळे कमी होत चाललेले पर्जन्यमान यावर मात करण्याच्या हेतूने वृक्षतोडीवर निर्बंध घालणे, उघड्यावर जनावरे चारायला सोडण्यावर प्रतिबंध घालून कुरणविकास करणे, गावाच्या विकासासाठी सामूहिक श्रमशक्तीचा उपयोग करुन प्रत्येक उपक्रम, योजना राबविताना सामूहिक श्रमदान करणे हे त्यामागील उद्देश होते.

गावाचा विकास शेतीवर व शेतीचा विकास पाण्यावर अवलंबून असतो हे सूत्र अण्णा हजारे व राळेगणसिध्दीने ओळखले; मग त्यावर नियोजनपूर्वक प्रयत्न केले. त्याचा परिणाम परिसर ‘सुजलाम् सुफलाम्’ होण्यात झाला. त्यासाठी पाणलोट क्षेत्र विकासाचे नियोजन केले. कित्येक दिवस एकत्रित श्रमदान केले. माथा ते पायथा नियोजन करुन पाण्याच्या कित्येक थेंब न् थेंब अडविला, जिरविला. विविध मार्गांनी पाणलोटाची नियोजनबध्द बांधणी केली. जसजशी पाणलोटाची कामे होत गेली तसतसा अपेक्षित परिणाम दिसू लागला.

शेती समृध्द केल्यानंतर राळेगणसिध्दी परिवाराने सामाजिक, शैक्षणिक आघाडीही मोठे काम उभे केले. ज्या योजना गावाने सुरु केल्या त्यांपैकी काही तर आता शासकीय पातळीवर महत्त्वाच्या योजना ठरल्या आहेत.

समृध्दी आली, शांतता आली आणि अण्णांसारखे आदर्श मार्गदर्शक लाभले, की मग समाजोपयोगी योजना व उपक्रमांची कशी रेलचेल सुरु होते याचे उदाहरण म्हणून राळेगणसिध्दीकडे पाहता येते.

**संदर्भ सूची :-**


१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००७-०८ अहमदनगर जिल्हा संक्षिप्त ओळख.

२) http:/en.wikipedia.org/wiki/parnertaluka#prominent personalities.

३) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००७-०८, अहमदनगर जिल्हा संक्षिप्त ओळख.

४) थोर समाजसेवक अण्णा हजारे यांच्या जीवनकार्यावर आधारित वृत्तचित्र : महात्म्याच्या पाऊलखुणांवर... : भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास, - साहित्य प्रकाशन

५) हजारे अण्णा : माझे गाव-माझे तीर्थ : स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन; राळेगणसिध्दी. पृ.क्र. २९, ३०. तृतीय सुधारित आवृत्ती, जाने. २०११.

६) हजारे अण्णा : माझे गाव-माझे तीर्थ : स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, पृ.क्र. ३६, ३७, ३८. तृतीय सुधारित आवृत्ती, जाने.२०११

७) व्ही. सी. डी. राळेगणसिध्दी : एक कायापालट : सामाजिक परिवर्तन, भौगोलिक परिवर्तन, आर्थिक परिवर्तन. निर्मिती साहाय्य : श्री संत यादवबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, मीडिया सेंटर, राळेगणसिध्दी.

८) व्ही. सी. डी. महात्म्याच्या पाऊलखुणांवर... : निर्मिती सहकार्य - बहिणाबाई प्रतिष्ठान पुणे, वितरण : भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास, साहित्य प्रकाशन, राळेगणसिध्दी.

९) हजारे अण्णा : माझे गाव-माझे तीर्थ, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, राळेगणसिध्दी, तृतीय सुधारित आवृत्ती, जाने. २०११, पृ.क्र. ४१, ४२, ४३.

१०) हजारे अण्णा : माझे गाव-माझे तीर्थ : स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, राळेगणसिध्दी, तृतीय सुधारित आवृत्ती, जाने. २०११, पृ.क्र. ५१, ५२, ५३, ५४, ५५.

११) हजारे अण्णा : माझे गाव-माझे तीर्थ : स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, राळेगणसिध्दी, पृ. क्रं. ५६ ते ६६.

१२) कित्ता : पृ. क्र . ६७ ते ७१.

१३) व्ही. सी. डी. : राळेगणसिध्दी : एक कायापालट, सामाजिक परिवर्तन, भौगोलिक परिवर्तन, आर्थिक परिवर्तन, निर्मिती सहकार्य : श्री संत यादवबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, मीडिया सेंटर, राळेगणसिध्दी.

१४) व्ही. सी. डी. : राळेगणसिध्दी : एक कायापालट, सामाजिक परिवर्तन, भौगोलिक परिवर्तन, आर्थिक परिवर्तन, निर्मिती सहकार्य : श्री संत यादवबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, मीडिया सेंटर, राळेगणसिध्दी.

१५) व्ही. सी. डी . महात्त्म्याच्या पाऊलखुणांवर.. निर्मिती सहकार्य : बहिणाबाई प्रतिष्ठान, पुणे.

१६) माझे गाव-माझे तीर्थ : तृतीय सुधारित आवृत्ती, जाने. २०११, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, राळेगणसिध्दी पृ. क्र. ८३, ८४, ८५, ८६, ८७, ८९.

१७) वाघ बाळासाहेब पां. : ग्रामविकासाची पाऊलवाट : राळेगणसिध्दी, मुद्रक व प्रकाशक, मीडिया सेंटर, राळेगणसिध्दी, पृ. क्र. ३७, ३८, ३९, ४०.

१८) व्ही. सी. डी. : राळेगणसिध्दी : एक कायापालट, सामाजिक परिवर्तन, आर्थिक परिवर्तन. भौगोलिक परिवर्तन, निर्मिती सहकार्य : श्री संत यादवबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, 'मीडिया सेंटर,' राळेगणसिध्दी.